पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ४४ ● गुरूवार , दि. २० ऑगस्ट २०२६ ●मूल्य ५ ●पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन सोसायची तयारी असावी लागते

सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोट शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
पवन बेलसरे
तालुका प्रतिनिधी
+91 7057706764

## »थोडक्यात

### नीटच्या विद्यार्थ्याची नैराश्यातून आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्याच्या वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १९ वर्षीय विद्यार्थ्याने टोकाचं पाऊल उचलत जीवन संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्याने त्याच्या खोलीतच गळफास घेऊन जीवन संपवल्याची दुर्दैवी घटना बुधवारी घडली. सूरज सुभाष शिंदे असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. नीट परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने आलेल्या नैराश्यातून त्याने टोकाचं पाऊल उचलल्याचे प्राथमिक पोलिस तपासात समोर आले आहे. सूरज हा घरीच नीट परीक्षेची तयारी करीत होता. जीवन संपवण्यापूर्वी त्याने दोन ओळींची चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यामध्ये, 'सॉरी, आई आणि आप्पा, नक्कीच पुढच्या जन्मी तुमच्यासाठी डॉक्टर बनेल. काळजी घ्या आणि आनंदी राहा,' असा मजकूर असल्याचे समोर आले आहे.

### श्रीमद्भगवद्गीता वाचल्यास अपघाती मृत्यू होत नाही - डॉ सूरदास

मुंबई : जे काही घडले, ते चांगले नाही झाले. मी अजित पवार यांच्या कक्षात जाऊन भगवद्गीता त्यांना भेट दिली होती आणि मी एकच गोष्ट त्यांना वारंवार सांगत होतो. कदाचित तुम्हालाही तो दिवस आठवत असेल; त्यांच्या कक्षात अनेक पत्रकारही उपस्थित होते. मी त्यांना म्हणालो, 'कृपया हे वाचा; आपण हे वाचलेच पाहिजे. याकडे केवळ एक सामान्य पुस्तक म्हणून पाहू नका.' 'मी तुम्हाला सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगतो, जो कोणी हे 'व्रत' पूर्णपणे वाचेल आणि आपल्या जीवनात आचरणात आणेल, त्याचा अकाली मृत्यू होणार नाही' असा दावाही इस्कॉन खारघरचे अध्यक्ष डॉ. सूरदास यांनी केला आहे.

### अध्यात्माच्या नावावर तरूणीचे शोषण!

पुणे : सोशल मीडियावरील प्रभावाचा गैरवापर करून तरुणींचे लैंगिक आणि मानसिक शोषण करणाऱ्या एका २३ वर्षीय भोंदू इन्फ्लुएन्सर आणि कथित आध्यत्मिक गुरुला कोंढवा पोलिसांनी जेरबंद केले आहे. स्वतःला एक वक्ता आणि अध्यात्मिक मार्गदर्शक भासवून, तरुणीला अर्धनग्न फोटो मागवण्याचा प्रयत्न या संशयिताने केला होता. दिव्य जितेंद्र परमार असे आरोपीचे नाव आहे.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय.व १२ वी समकक्ष कोर्सेस

१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश
पात्रता १० वी, १२ वी पास / नापास, टक्कवारीची अट नाही
डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश

संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल
ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती
मो. नं.- 8087958087

# वैध, अवैधच्या खेळात प्रकल्पग्रस्तांच्या नोकऱ्या खाणारा कोण ?

## कृषी विद्यापीठाने नियुक्तीचा आदेश देत चौघांना ज्वॉईन केले नाही

## जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार; प्रकल्पग्रस्तांचे भवितव्य टांगणीला







प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला** : वैध आणि अवैधच्या प्रशासकीय खेळात प्रकल्पग्रस्तांच्या हक्काच्या नोकऱ्यांवर गदा आणण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कनिष्ठ संशोधन सहाय्यक आणि परिचर या पदांवर रीतसर निवड होऊन नियुक्तीचे आदेश मिळालेल्या चार उमेदवारांना अद्याप सेवेत रुजू करून घेण्यात आले नाही. अशी धक्कादायक माहिती मिळाली आहे. यासर्व प्रकारची तर चौकशी होण्याची गरज असून जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. कपले, पोलकट, इंगळे आणि वानखडे अशी या दुर्दैवी उमेदवारांची नावे आहेत. या चौघांना जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी सुरुवातीला प्रकल्पग्रस्ताचे वैध प्रमाणपत्र दिले होते. मात्र, नियुक्ती पत्र मिळून प्रत्यक्ष रुजू होण्याची वेळ आली असता, याच अधिकाऱ्यांनी आधी दिलेले प्रमाणपत्र 'अवैध' ठरवले. प्रशासनाच्या या परस्परविरोधी निर्णयामुळे विद्यापीठ प्रशासनाने त्यांना सेवेत समाविष्ट करून घेण्यास नकार दिला आहे. जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडून वाटप करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्त दाखल्यांची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे. आधी वैध आणि नंतर अवैध ठरवण्याच्या या प्रक्रियेमागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### दलाल आणि एजंट्सचा विळखा

»पुनर्वसन विभाग सध्या एजंट आणि दलालांच्या पूर्णपणे विळख्यात सापडला आहे. सर्वसामान्य नागरिकांना किंवा प्रकल्पग्रस्तांना दाद न देणारे अधिकारी ठराविक विशिष्ट लोकांशीच आणि दलालांशीच थेट संवाद साधत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची वास्तव बाजू जाणून घेण्यासाठी 'आर आर सी न्यूज' व 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या प्रतिनिधींनी जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी प्रतिसाद देण्याचे टाळले. कारभारात पारदर्शकता असेल तर प्रसारमाध्यमांना माहिती देण्यापासून अधिकारी का पळ काढत आहेत, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

### आयुक्तांच्या चौकशीकडे सर्वांचे लक्ष

»कृषी विद्यापीठातील प्रशासकीय अनागोंदीला आणि पात्र उमेदवारांच्या झालेल्या अन्यायाला जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांचा कारभार थेट हातभार लावत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. याप्रकरणी विभागीय आयुक्तांकडून सुरू असलेल्या चौकशीत नेमके काय तथ्य बाहेर येते आणि दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, याकडे सर्व प्रकल्पग्रस्त आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. कपले, पोलकट, इंगळे आणि वानखडे या जेआरए आणि एसआरए पदासाठी नियुक्ती झाली होती. पण, जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी त्यांचे आधी दिलेले प्रकल्पग्रस्ताचे वैध प्रमाणपत्र नंतर अवैध ठरविले आणि नोकरीचे नियुक्ती पत्र मिळून या चौघांना विद्यापीठ प्रशासनाने ज्वाईन केले नाही.

# अंशकालीन शिक्षकांच्या नियुक्तीला खो

## सीईओंच्या भेटीसाठी आलेल्यांची टंगळमंगळ, मग न्याय मागायचा कुणाकडे?

प्रतिनिधी २० ऑगस्ट

अकोला: जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दोन महिने उलटले तरी अंशकालीन शिक्षकांच्या नियुक्त्या रखडल्याने ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले आहे. दरवर्षी ३० जूनपर्यंत होणाऱ्या या नियुक्त्या आज २० ऑगस्ट उजाडला तरी कागदावरच अडकल्या आहेत. एका बाजूला ३३ शिक्षकांच्या निलंबनाने अकोला जि. प. शिक्षण विभाग आधीच कलंकित झाला असताना, आता अंशकालीन शिक्षकांच्या नियुक्तीबाबत प्रशासनाकडून सुरू असलेली टोलवाटोलवी आणि अनास्था उघड झाली आहे. पातूरसह सर्वच तालुक्यांमध्ये हीच गंभीर परिस्थिती आहे. शैक्षणिक वर्षाचा अर्धा कालावधी संपत आला तरी शाळांमध्ये शिक्षकच नाहीत. यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे.

### सीईओंचा दरवाजा बंद,!

आपला न्याय हक्क मागण्यासाठी जिल्हा परिषदेत येणाऱ्या अंशकालीन शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अनय नावंदर यांची भेटच दिली जात नाही. तक्रार घेऊन जाणाऱ्यांना थेट 'शिक्षणाधिकारी प्राथमिक' यांच्या दालनात रवाना केले जाते. ज्या विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे हा खोळंबा झाला आहे, त्याच अधिकाऱ्याकडे पुन्हा दाद मागण्यासाठी पाठवणे म्हणजे 'चोराच्या हाती तिजोरीची सुत्रे' देण्यासारखा प्रकार आहे. वरिष्ठांकडूनच जर सामान्यांची अशी बोळवण होणार असेल, तर न्याय मागायचा कुणाकडे? असा संतप्त सवाल आता नागरिक आणि शिक्षक विचारत आहेत.

### प्रशासनाला जबाबदारीचे भान कधी येणार?

एकीकडे शिक्षकांवर धाडसत्र आणि निलंबनाची कारवाई करून पारदर्शकतेचा आव आणणारे जि. प. प्रशासन स्वतःच्या जबाबदारीपासून मात्र पळ काढताना दिसत आहे. या भोंगळ कारभाराला जबाबदार कोण? शिक्षकांच्या नियुक्त्या नेमक्या कशामुळे अडकल्या आहेत? आणि लोकशाहीत सनदी अधिकाऱ्यांना भेटण्याचा अधिकार नागरिकांना कधी मिळणार? या प्रश्नांची ठोस उत्तरे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ द्यावीत, अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला जात आहे.




एका सामाजिक कार्यकर्त्याने आत्मदहनचा इशार दिल्यानंतर आज जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांना लॉक लावण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांना का ठोकले लॉक ?

# सुप्रीम कोर्टातील सत्तासंघर्षाचा थेट फायदा भाजपलाच....!

प्रविण वानखडे/२० ऑगस्ट



**अकोला:** महाराष्ट्रातील शिवसेना-सत्तासंघर्षावरून सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या न्यायालयीन लढाईवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी जोरदार निशाणा साधला आहे. अकोला येथे आयोजित पत्रकार परिषदेत प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील सध्याच्या राजकीय स्थितीवर आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांवर रोखठोक भाष्य केले. ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, सुप्रीम कोर्टात एका बाजूला एकनाथ शिंदे आणि दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे भांडत आहेत. या दोघांच्या राजकीय वादात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मध्यस्थीची भूमिका घेत दोन्ही बाजूंचा राजकीय फायदा उचलत आहेत. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावरून निकालाची दिशा स्पष्ट होत असून, सुरुवातीला आवश्यक ती काळजी न घेतल्यानेच निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला दिलेले पक्ष आणि चिन्ह यावर एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले आहे. या संपूर्ण राजकीय नाट्याचा आणि न्यायालयीन लढाईचा अंतिम फायदा थेट भारतीय जनता पक्षालाच (भाजप) होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यातील वाद हा मूलतः पक्षांतर्गत स्वरूपाचा असल्याने तो 'सिव्हिल' न्यायालयाच्या चौकटीतच निकाली निघायला हवा होता, अशी ठाम भूमिका आंबेडकर यांनी मांडली. सिव्हिल कोर्टातली भांडणे सिव्हिल कोर्टातच निपटली पाहिजेत, असे सांगत त्यांनी निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रक्रियेमुळे एकमेकांना फसवण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकर यांनी इतरही अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. शिवसेनेचे पक्षचिन्ह गोठवले जाण्याची (फ्रिज) शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) अमेरिकेत नोंदणीकृत असून भारतात नोंदणीकृत नाही, या विडंबनाकडे लक्ष वेधले. याशिवाय, मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांच्यामागे असलेले मराठा समाजाचे नेते भविष्यात ओबीसी मतांच्या गणितांमुळे त्यांच्यासोबत राहणार नाहीत, असा दावाही त्यांनी केला. सध्या शिवसेनेचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्हाबाबतचा वाद अंतिम टप्प्यात असून, प्रकाश आंबेडकर यांच्या या घणाघाती वक्तव्यामुळे राजकीय आणि कायदेशीर वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

# अकोला महापालिकेत 22.50 कोटींच्या दलितवस्ती निधी वाटपात गैरव्यवहार

## विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसेन यांची विधानमंडळ समितीकडे तक्रार

## अनुसूचित जाती कल्याण समितीने झापले आयुक्तांना,पेशी लागणार

प्रतिनिधी २० ऑगस्ट



**अकोला:** अकोला महानगरपालिकेला सन २०२५-२६ या वर्षात प्राप्त झालेल्या २२.५० कोटी रुपयांच्या 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलितवस्ती सुधार निधी'च्या वाटपात मोठा गैरव्यवहार आणि अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसेन यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्षांकडे पत्राद्वारे तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली आहे. यावेळी वंचित गटनेता निलेश देव, विजय इंगळे, शंकर लंगोटे, अभय खुमकर, उज्वला पातोडे, जयश्री घनबहादूर, स्मिता गजानन कांबळे आदी नगरसेवकांची उपस्थिती होती. समितीच्या अध्यक्षांनी ही गंभीर बाब असून महापालिका प्रशासनाला या विषयी विचारले जाईल असे आश्वासन विरोधातील नगरसेवकांना दिले.

विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या पत्रानुसार, महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करताना कामांची कोणतीही यादी सभागृहापुढे मांडण्यात आली नव्हती. तसेच, त्यावेळी मनपाला निधीही प्राप्त झालेला नव्हता. निधीचे सर्व अधिकार महापौरांना देण्यात आले होते. शासन नियमानुसार प्रभागातील दरडोई उत्पन्न व लोकसंख्येनुसार निधीचे वाटप होणे अपेक्षित असताना, महापौरांनी मनमानी पद्धतीने फक्त सत्ताधारी नगरसेवकांच्या प्रभागात निधी वर्ग केला. विरोधी पक्षातील नगरसेवकांच्या प्रभागांवर पूर्णपणे अन्याय करण्यात आला आहे.'सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या जोरावर शासन निर्णयाचे उल्लंघन करून मागासवर्गीय निधीचा दुर्विनियोग केला आहे. या प्रकारात मनपा प्रशासन सत्ताधाऱ्यांना पाठीशी घालत असून प्रशासनाची भूमिकाही संशयास्पद आहे,' असा आरोप डॉ. झिशान हुसेन यांनी केला आहे. अकोला मनपातील दलितवस्ती निधी वाटपातील अनियमीततेची सखोल चौकशी करण्यात यावी. सत्ताधाऱ्यांनी मनमानी पद्धतीने मंजूर केलेला ठराव तात्काळ विखंडित (रद्द) करण्यात यावा. शासन नियमानुसार दरडोई उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेऊन सर्व प्रभागांमध्ये समान निधीचे वाटप करण्याचे निर्देश मनपा प्रशासनाला देण्यात यावेत.

आज महापालिकेत आलेल्या समितीने महापालिकेतील अनागोंदी कारभारावर मनपा आयुक्तांवर जोरदार ताशेरे ओढले. इतकेच नाही तर त्यांची पेशी मुंबईत लावण्याचा आदेश दिल्याची माहिती आहे. रमाई आवास योजनेत नवी कोरी बोलेरो घेणे, मनपात रंगरंगोटी करणे आदी कामे केल्याचा संताप समिती सदस्यांनी व्यक्त केला. तर आऊट सोर्सिंग मध्ये अनुसूचित जाती च्या उमेदवारांना प्राधान्य का दिले गेले नाही याची विचारणा केली. १७८ अनुसूचित जातीचे उमेदवारांना डावलल्या गेल्याची माहिती समोर आली आहे. तर दलित वस्तीत दरडोई प्रमाणात खर्च न करता इतरत्र निधी वळता करण्यावर समिती सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.महापालिकेच्या प्रशासकीय कारभारावर जोरदार ताशेरे ओढल्याची माहिती मिळाली आहे.

# नरेंद्र मोदींचा पंतप्रधान म्हणून शेवटचा वाढदिवस!

## खा. संजय राऊत यांचे भाकीत : 17 सप्टेंबरनंतर वाईट परिस्थितीत सोडावे लागेल पद

प्रतिनिधी २० ऑगस्ट



**मुंबई** : १७ सप्टेंबर त्यांचा वाढदिवस आहे, काय आहे, खूप अभ्यास करून इथे उभं रहावं लागत आम्हाला, १७ सप्टेंबर नंतर असं काय होईल ते कळेल, १७ सप्टेंबरला त्यांचा वाढदिवस आहे, त्यांचा प्रधानमंत्री म्हणून तो शेवटचा वाढदिवस असेल, तो त्यांनी आंनदांत साजरा करावा, त्यांच्या भक्तांनी नाचावं, अंधभक्ताने उड्या माराव्यात, गाणं बिनं गावं, पार्ट्या कराव्यात रात्री, नंतर पुढल्या प्रसंगाला त्यांनी सामोर जावं, अमित शाह कधीच प्रधानमंत्री होणार नाहीत, मोदी गये तो अमित शाह भी गये, हैं क्या, एकावर एक प्रश्नी आहेत ना ते, असा खोचक टोला खा. संजय राऊत यांनी लगावलो.दिल्लीमध्ये काल (बुधवारी, ता१९) काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर आणि पक्षाच्या भविष्यातील रणनीतीबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. तर या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती असल्याचे वृत्त समोर आलं आहे. या बैठकीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोठं विधान केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ ते ८ महिन्यांत पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असे राहुल गांधी यांनी बैठकीत म्हटल्याची माहिती आहे.

यावरती गुरूवारी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावरती उत्तर देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राऊत म्हणाले, मग मी गेले काही दिवस झाले काय सांगतो आहे, राहुल गांधींचं माझं एकमत आहे या विषयावर, मला माहिती आहे ना, गेले काही महिने मी हेच सांगतोय की, हे महाशय जे आहेत प्रधानमंत्री सध्या, ते त्यांची टर्म पूर्ण करत नाहीयेत. त्यांना अत्यंत वाईट परिस्थितीत हे पद सोडावे लागत आहे, तुम्हाला १७ सप्टेंबर नंतर या गोष्टीचा उलगाडा होईल.

### लाल किल्ल्यावर त्यांचे प्रधानमंत्री म्हणून शेवटचे भाषण

माझ्याकडे जे काय आकलन आहे, किंवा राहुल गांधी जे सांगतात, आम्ही जी काही चर्चा करतो, आमच्या समोर जे काही तथ्य येतात, जसं आम्ही म्हणालो की, लाल किल्ल्यावर त्यांचे प्रधानमंत्री म्हणून शेवटचे भाषण आहे, तसं हा प्रधानमंत्री म्हणून त्यांचा वाढदिवस कदाचित शेवटचा असेल, हे जवळजवळ जागतिक स्तरावरच मी चित्र सांगतोय, असंही पुढे संजय राऊतांनी म्हटलं आहे.

# उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मिळणार दोन हजारांचा पॉकेटमनी!

## राज्य सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

प्रतिनिधी २० ऑगस्ट

मुंबई : राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी आर्थिक मदत आणि आत्मविश्वास वाढवण्याच्या दृष्टिकोनातून दोन हजार रुपये पॉकेटमनी उपलब्ध करून देण्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा प्रयत्न आहे.

यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग विद्यापीठ त्यासोबतच मोठे महाविद्यालय यांच्यासोबत चर्चा करून सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना दरमहा दोन हजार रुपये घेण्याचा विचार करत आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी मुंबईतील काही महाविद्यालयातील विद्यार्थी त्यासोबतच शिक्षकांशी मंत्रालयात संवाद साधला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यासोबत त्यांच्या अडचणी सुद्धा जाणून घेतल्या. यावेळी उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी आपण कमवा आणि शिका या धर्तीवर मुलींसाठी महिन्याला दोन हजार रुपये देता यावे यासाठी विभाग म्हणून प्रयत्न करत असल्याचे सांगितलं आहे. यामुळे विद्यार्थिनींचे उच्च शिक्षण घेण्याचा टक्का राज्यात वाढेल.

### फुकट पैसे कसले वाटताय, आधी... - अमित ठाकरे

फुकट पैसे कसले वाटताय, तुम्ही कॉलेजची हालत पहिले नीट करा ना, कॉलेजच्या मुलांना तुम्ही फुकट पैसे देतायत, ज्या मुलांना आता अक्कल येते, जे मुलं तरुण आहेत, त्यांना माहित नाही, त्यांना फुकट २००० रूपये आल्यावर काय होईल? तुमची आता लाडकी बहिण गेली, आता लाडकी मुलगी आली. काय म्हणजे तुम्ही अट्रॅक्ट करायला काही किती फुकट पैसे वाटणार आहात आणि जबाबदारी पण चंद्रकांतदादा पाटील घेणार आहेत का, असा सवालही अमित ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

## बहरली वनराई

'बहरली वनराई' हे निसर्गाच्या अद्भुत आणि नयनरम्य रूपातले एक जिवंत प्रतीक आहे. पावसाळ्याचे आगमन होताच किंवा वसंताच्या आगमनाने जेव्हा वृक्ष-वल्लींना नवी पालवी फुटते, तेव्हा संपूर्ण रान हिरव्यागार शालूने नटल्यासारखे दिसते. हा काळ म्हणजे वनराईच्या खऱ्या अर्थाने बहरण्याचा काळ असतो.

बहरलेल्या वनराईत प्रत्येक झाड, प्रत्येक वेली जणू आनंदाने डोलत असते. आंब्याचा मोहर, गुलमोहराची लालचटक फुले, बांबूची उंचच उंच बेटे आणि गवत या सर्वांमुळे रानोमाळ एक वेगळाच उत्साह भरून राहतो. या हिरवळीत पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांची रंगीबेरंगी भ्रमंती आणि वाहणाऱ्या ओढ्या-नाल्यांचा खळाळाट निसर्गाचे एक मधुर संगीत तयार करतो. वनराई केवळ डोळ्यांना सुखद वाटत नाही, तर ती पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीचा मुख्य आधार आहे.

## दंड सर्व सामान्यालाच का?

# नियम नागरिकांसाठी असतील, तर जबाबदारी प्रशासनाचीही असली पाहिजे

नियम हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी असतात आणि ते प्रत्येक नागरिकाने पाळलेच पाहिजेत. वाहतूक नियम, हेल्मेटचा वापर, प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता किंवा सार्वजनिक शिस्त—या सर्व बाबतीत कायद्याचे पालन करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मात्र, नियमांची अंमलबजावणी करताना एक मूलभूत प्रश्न आज सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे—चूक झाली तर दंड फक्त सर्वसामान्य माणसालाच का? शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणा आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरली तर त्यांची जबाबदारी कोण ठरवणार?

हेल्मेट न वापरल्यास दंड होतो. वाहनाचा प्रदूषणाचा नियम मोडला तर कारवाई होते. वाहतुकीचा नियम मोडला तर दंड आकारला जातो. हे योग्यच आहे. कारण नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नियम आवश्यक आहेत. पण त्याचवेळी खराब रस्त्यांमुळे अपघात होत असतील, रस्त्यावर मोठमोठे खड्डे असतील, नाल्या तुंबलेल्या असतील, पथदिवे बंद असतील, वाहतुकीचे नियोजन अपुरे असेल किंवा एखादे सार्वजनिक काम वर्षानुवर्षे रखडले असेल, तर त्या परिस्थितीची जबाबदारी कोणाची? नागरिकांच्या चुकांसाठी दंड आहे, मग प्रशासनाच्या निष्काळजीपणासाठी उत्तरदायित्वाची व्यवस्था किती प्रभावी आहे? हा प्रश्न विचारणे चुकीचे नाही; उलट तो लोकशाहीतील जागरूक नागरिकत्वाचा भाग आहे.

### हेल्मेटची सक्ती योग्य; पण रस्त्यांची सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची

हेल्मेटमुळे अपघाताच्या वेळी डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतीचा धोका कमी होऊ शकतो. त्यामुळे दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. परंतु रस्ते सुरक्षित ठेवणे हीसुद्धा सार्वजनिक यंत्रणेची जबाबदारी आहे. एखादा नागरिक हेल्मेट न घातल्यामुळे दंड भरतो; पण त्याच नागरिकाला खराब रस्त्यामुळे रोज धोका पत्करावा लागत असेल तर त्याचे काय? रस्त्यावर खड्डे आहेत, पावसाळ्यात पाणी साचते, झाकण नसलेल्या नाल्या आहेत, पथदिवे बंद आहेत, वाहतुकीचे नियोजन विस्कळीत आहे—अशा परिस्थितीत केवळ नागरिकांवर नियमांचा बडगा उगारून सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण होणार नाही. नियमांसोबत सुविधा आणि उत्तरदायित्वही आवश्यक आहे.

### पाच वर्षांसाठी मत घेतले, तर पाच वर्षांची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे

लोकशाहीत आमदार, खासदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी नागरिकांच्या मतांमधून निवडून येतात. नागरिक त्यांना केवळ पद देत नाहीत; ते त्यांच्यावर विश्वास ठेवतात. घरापर्यंत जाणारा रस्ता, गावातील नाली, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, शाळा, सार्वजनिक वाहतूक, पूल, महामार्ग आणि इतर मूलभूत सुविधा याबाबत नागरिकांच्या अपेक्षा असतात. निवडणुकीच्या काळात आश्वासने दिली जातात; मग ती आश्वासने पूर्ण करण्याची वेळ आली की नागरिकांनी प्रश्न विचारणे साहजिकच आहे. याचा अर्थ प्रत्येक विलंबासाठी थेट लोकप्रतिनिधीला वैयक्तिक दंड करावा, असा सरसकट नियम नव्हे. परंतु कामात निष्काळजीपणा, निधीचा गैरवापर, भ्रष्टाचार, नियमभंग किंवा जाणीवपूर्वक कर्तव्यच्युती आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर आणि पारदर्शक कारवाई झाली पाहिजे, ही जनतेची रास्त अपेक्षा आहे. निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जनतेसमोर उत्तर द्यावे लागले पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांवर त्यांच्या सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई झाली पाहिजे. कंत्राटदाराने निकृष्ट काम केले तर त्याच्यावर करारातील तरतुदींनुसार दंड आणि इतर कारवाई झाली पाहिजे. आणि सार्वजनिक निधीचा गैरवापर झाला असल्यास त्याची चौकशी होऊन दोषींवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

### सरकारी कर्मचारीही व्यवस्थेचे सेवक; मालक नव्हेत

सर्व सरकारी कर्मचारी चुकीचे वागतात, असे म्हणणे अन्यायकारक ठरेल. असंख्य अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतात. मात्र, काही ठिकाणी काम करून घेण्यासाठी नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागतो, अशी तक्रार वारंवार ऐकायला मिळते.

एखाद्या नागरिकाचे काम नियमांनुसार असूनही ते विनाकारण लांबवले जात असेल, त्याला कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावल्या जात असतील किंवा काम करून देण्यासाठी अनुचित आर्थिक मागणी केली जात असेल, तर हा केवळ त्या नागरिकाचा प्रश्न राहत नाही; तो संपूर्ण प्रशासनाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न बनतो. नागरिकाने नियम मोडल्यास दंड आणि सरकारी यंत्रणेतील जबाबदार व्यक्तीने नियम मोडल्यास चौकशी—दोन्ही समान गांभीर्याने झाले पाहिजे.



कर्तव्यच्युती सिद्ध झाल्यास संबंधित सरकारी कर्मचाऱ्यावर लागू सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई, निलंबन, दंड किंवा इतर कायदेशीर उपाययोजना होऊ शकतात. मात्र, अशा कारवाईसाठी स्पष्ट प्रक्रिया, पुरावे आणि निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे. अन्यथा कारवाईही राजकीय किंवा वैयक्तिक दबावाचे साधन बनू शकते.

### गाडी जुनी झाली तर कारवाई; व्यवस्था जुनी झाली तर काय?

प्रदूषण करणारे किंवा नियमबाह्य वाहन रस्त्यावर चालत असेल तर प्रशासन त्यावर कारवाई करते. हेही आवश्यक आहे. कारण पर्यावरण आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहिले पाहिजे.

### पण मग एक वेगळा प्रश्न विचारावासा वाटतो

एखादी व्यवस्था वर्षानुवर्षे निकृष्ट काम करत असेल, एखादे सार्वजनिक काम सतत रखडत असेल किंवा एखाद्या कार्यालयात नागरिकांची कामे विनाकारण प्रलंबित राहत असतील, तर त्या व्यवस्थेचे उत्तरदायित्व कसे निश्चित केले जाते? व्यक्तीची चूक शोधण्याइतकीच व्यवस्थेची चूक शोधण्याची सवय प्रशासनात निर्माण झाली पाहिजे. सामान्य माणूस कमकुवत आहे म्हणून त्याला गृहीत धरू नका सामान्य माणसाकडे मोठी सत्ता नसते. त्याच्याकडे राजकीय पद नसते. अनेकदा मोठ्या कार्यालयांच्या दारात उभे राहण्याचीही त्याची ताकद नसते. त्याच्याकडे घर चालवण्याची चिंता असते, मुलांचे शिक्षण असते, आरोग्याचा खर्च असतो, व्यवसायाचा संघर्ष असतो. छोटा दुकानदार, छोटा उद्योजक, शेतकरी, रोजंदारीवर काम करणारा कामगार, वाहनचालक—हे सर्व आपल्या परीने अर्थव्यवस्थेत योगदान देतात. त्यांच्यासाठी प्रत्येक दंड हा केवळ कागदावरील आकडा नसतो; तो त्यांच्या कुटुंबाच्या अर्थसंकल्पावर परिणाम करणारा भार असू शकतो. म्हणूनच दंडव्यवस्था अन्यायकारक नसावी. दंड हा नागरिकाला त्रास देण्यासाठी नसून नियमांचे पालन करवून घेण्यासाठी असला पाहिजे.

### लोकप्रतिनिधींना शिक्षा नव्हे, पण लोकशाहीत उत्तरदायित्व नक्की

आमदार किंवा खासदार हे सरकारी कर्मचारी नाहीत; त्यामुळे त्यांच्यावर सरकारी कर्मचाऱ्यांसारखी निलंबनाची प्रक्रिया सरसकट लागू होत नाही. मात्र, याचा अर्थ ते उत्तरदायित्वाच्या पलीकडे आहेत असा अजिबात नाही. त्यांना जनतेसमोर उत्तर द्यावे लागते. विधिमंडळातील प्रश्न, सार्वजनिक लेखापरीक्षण, प्रशासकीय चौकशी, भ्रष्टाचारविरोधी कायदे, निवडणूक प्रक्रिया आणि न्यायव्यवस्था अशा विविध लोकशाही व कायदेशीर यंत्रणा उपलब्ध आहेत. या यंत्रणा प्रभावी, निष्पक्ष आणि वेळेवर काम करणे गरजेचे आहे. लोकशाहीचा खरा अर्थ असा नाही की नागरिकांनी पाच वर्षे शांत बसावे; तर नागरिकांनी सतत प्रश्न विचारण्याचा आणि सत्ताधाऱ्यांनी सतत उत्तर देण्याचा तो करार आहे. 'सर्वसामान्य माणसाचा आवाज' दाबला जाऊ नये सामान्य नागरिकाला प्रशासनाकडून दया नको आहे; त्याला न्याय, सुविधा आणि सन्मान हवा आहे. त्याला नियमांपासून सूट नको आहे; पण नियम सर्वांसाठी समान असावेत, एवढीच अपेक्षा आहे. त्याला दंड नको असे नाही; पण दंडासोबत चांगली व्यवस्था हवी आहे. त्याला सरकारविरोधी संघर्ष नको; त्याला जबाबदार आणि संवेदनशील सरकार हवे आहे. त्याला अधिकारी शत्रू नको; त्याला आपले काम करून देणारी प्रशासनव्यवस्था हवी आहे. त्याला लोकप्रतिनिधींशी वैर नको; त्याला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी त्यांना जाब विचारण्याचा अधिकार हवा आहे.

### शेवटचा प्रश्न—दंड कोणाला?

म्हणून आज प्रश्न हेल्मेटचा एवढाच नाही. प्रश्न आहे समान उत्तरदायित्वाचा. नागरिकाने नियम मोडला तर त्याला कायद्यानुसार दंड द्या. पण प्रशासनाने कर्तव्यच्युती केली तर त्याचीही चौकशी करा. सार्वजनिक कामात भ्रष्टाचार किंवा गंभीर निष्काळजीपणा आढळला तर दोषींवर कारवाई करा. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला जबाबदार धरा. सरकारी कर्मचाऱ्याने गैरवर्तन किंवा कर्तव्यच्युती केली तर सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करा. लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने आणि त्यांच्या कार्याचा नागरिकांनी प्रश्न विचारला तर त्याला लोकशाहीचा भाग म्हणून स्वीकारा.

### सत्तेचा अर्थ अधिकार नसून जबाबदारी आहे

सामान्य माणूस कमकुवत दिसतो म्हणून त्याला सतत नियम, दंड आणि त्रासाच्या चक्रात ठेवणे ही लोकशाहीची कल्पना नाही. सामान्य माणूसच कर भरतो, मतदान करतो, अर्थव्यवस्थेला हातभार लावतो आणि देश उभा करतो.

### त्याच्या सहनशीलतेचा गैरफायदा घेऊ नये

कारण अन्याय सहन करणाऱ्या माणसाच्या मनात निर्माण होणारी वेदना ही केवळ वैयक्तिक नसते; ती संपूर्ण व्यवस्थेविषयीच्या विश्वासाला तडा देऊ शकते. म्हणूनच लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि प्रशासन यांनी नागरिकांच्या भावना, अडचणी आणि तक्रारी गांभीर्याने ऐकल्या पाहिजेत. अन्यायाला धार्मिक किंवा दैवी शिक्षेची भाषा देण्यापेक्षा कायदा, लोकशाही आणि नैतिक जबाबदारीच्या चौकटीत उत्तरदायित्व निश्चित करणे हीच अधिक मजबूत आणि टिकाऊ वाट आहे. खरी जीवनजागृती म्हणजे केवळ हेल्मेट घालण्याची सक्ती नव्हे. खरी जीवनजागृती म्हणजे नागरिकाला सुरक्षित रस्ता, स्वच्छ पाणी, चांगले शिक्षण, सक्षम आरोग्यव्यवस्था, पारदर्शक प्रशासन आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे. नियम नागरिकांनी पाळलेच पाहिजेत; पण सत्तेवर असणाऱ्यांनीही आपल्या जबाबदाऱ्या तितक्याच प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. दंडाची भीती निर्माण करण्यापेक्षा उत्तरदायित्वाची संस्कृती निर्माण करा—कारण लोकशाहीत सरकार नागरिकांपेक्षा मोठे नसते; सरकार नागरिकांसाठी असते.


**निवृत्ती तयाडे**

गाव.हिवरखेड तालुका. तेल्हारा. जिल्हा. अकोला

मो. 7709517019


### कर भरतो नागरिक; सुविधा कुठे आहेत?

पेट्रोल-डिझेल, वस्तू आणि सेवांवरील कर, स्थानिक कर, विविध शुल्क—या माध्यमातून नागरिक थेट किंवा अप्रत्यक्षपणे शासनाच्या महसुलात योगदान देतो. त्याबदल्यात नागरिकांना चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, आरोग्यसेवा, शिक्षण, स्वच्छता, सुरक्षित वाहतूक आणि सक्षम सार्वजनिक व्यवस्था अपेक्षित असते. म्हणूनच नागरिकाने विचारले की, "आमच्याकडून घेतलेल्या पैशाचा उपयोग कुठे झाला?", तर तो प्रश्न विरोधाचा नसून लोकशाहीतील हक्काचा आहे. सरकारनेही या प्रश्नाला विरोध म्हणून न पाहता उत्तरदायित्वाची संधी म्हणून पाहिले पाहिजे.

### आरोग्याबाबतही समान निकष हवा

जर सरकार नागरिकांच्या आरोग्याबद्दल गंभीर असेल, तर हेल्मेटच्या नियमाबरोबरच तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा, अवैध विक्री, भेसळयुक्त अन्न, दूषित पाणी, अस्वच्छ परिसर आणि कचरा व्यवस्थापन या प्रश्नांकडेही तितक्याच गांभीर्याने पाहिले पाहिजे.

नागरिकाचे आरोग्य केवळ वाहन चालवताना धोक्यात येत नाही. ते दूषित पाणी, अस्वच्छ परिसर, भेसळयुक्त अन्न आणि अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळेही धोक्यात येऊ शकते. म्हणून जीवनजागृती ही सर्वसमावेशक असली पाहिजे.

### दंडापेक्षा जनजागृती महत्त्वाची

एखाद्या नागरिकाने हेल्मेट वापरले नाही म्हणून दंड करणे हा उपाय असू शकतो; पण हेल्मेट का आवश्यक आहे, दर्जेदार हेल्मेट कसे निवडावे आणि सुरक्षित वाहनचालकत्व का महत्त्वाचे आहे, याबाबत जनजागृती करणे त्याहून महत्त्वाचे आहे. शासनाने शक्य तिथे नागरिकांना दर्जेदार सुरक्षा साधने परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होण्यासाठी योजना आणि जनजागृतीचा विचार करावा. नियम स्पष्ट असावेत, त्यांची अंमलबजावणी समान असावी आणि कारवाई पारदर्शक असावी.

### 'उत्तरदायित्व' हीच खरी पुढची मोहीम

आज हेल्मेट तपासणीची मोहीम राबवली जाते. उद्या त्याच ताकदीने 'सार्वजनिक कामांची उत्तरदायित्व मोहीम' राबवली तर? कोणता रस्ता कधी मंजूर झाला? किती निधी मंजूर झाला? कामाची मुदत किती होती? काम पूर्ण झाले का? निकृष्ट काम आढळले का? विलंब का झाला? जबाबदार अधिकारी कोण? संबंधित कंत्राटदारावर कारवाई झाली का?—या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक झाली तर नागरिकांचा शासनावरील विश्वास वाढेल.

प्रत्येक मोठ्या सार्वजनिक कामासाठी निधी, कालमर्यादा, जबाबदार विभाग आणि कामाची सद्यस्थिती नागरिकांना सहज उपलब्ध झाली पाहिजे. काम वेळेत पूर्ण न झाल्यास कारण स्पष्ट झाले पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे.

# जलसंधारणाच्या उपाययोजना

राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' तसेच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा जलसंधारण दिन त्यांच्या जलसंधारणविषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. या जलसंधारण अभियानाच्या निमित्ताने जलसंधारणाच्या विविध उपाययोजनाविषयी ही माहिती....

कमी पाण्यामध्ये जास्त फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजना आपल्या शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीमधील पिकांमध्ये तसेच उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे काटकसरीने वापर केला जाऊ शकतो व कमी पाण्यात बहारदार शेतीचा प्रयोग करता येऊ शकतो या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजनांचा कल्पकतेनं वापर केला पाहिजे. मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर करताना पाऊसमान, जमिनीचा प्रकार, उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन या बाबी लक्षात घ्याव्यात. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत.

जमिनीच्या उतारानुसार जमिनीचे निरनिराळे भाग करावेत. त्यानुसार बांध टाकावेत, बांधाच्या आतील भागाचे सपाटीकरण करावे. सध्याच्या काळात फुटलेले बांध दुरुस्त करावेत. योग्य ठिकाणी सांडवा ठेवावा. त्यामुळे जादा झालेले पाणी सुरक्षितरीत्या शेताबाहेर काढता येते. सांडव्यामधून माती वाहून जाऊ नये म्हणून त्यामध्ये दगडी बांध घालावेत. मातीचे बांध पुन्हा पावसाने फुटू नयेत यासाठी पावसाळ्यात त्यावर स्टायलो, मद्रास अंजन, खस, सुबाभूळ, ग्लिरिसिडियाची लागवड करावी. जमिनीची प्राथमिक मशागत केल्यानंतर पाऊस जागच्या जागी मुरविण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये जादा होणारे पाणी शेताबाहेर काढण्यासाठी योग्य ठिकाणी ढाळीचे बांध ठेवावेत. जादा झालेले पाणी हे पाणी वाहून नेणाऱ्या चरामध्ये सोडावे. हा चर गवताने आच्छादित करावा. चराच्या उताराबद्दल काळजी घ्यावी. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. शेतातील जादा झालेले पाणी हे योग्य त्या तांत्रिक गोष्टींचा अवलंब करून विहीर किंवा कूपनलिका पुनर्भरणासाठी वापरावे. जादा झालेले पाणी वैयक्तिक किंवा सामूहिक स्तरावर शेततळे खोदून साठवावे. पाऊस, पाणलोट

क्षेत्र, जमिनीचा प्रकार, उतार, पीक पद्धती इत्यादींचा विचार करून शेततळ्याचे आकारमान व ठिकाण ठरवावे. पाझर तलाव, बंधारे इत्यादींची साठवणक्षमता अबाधित ठेवण्यासाठी त्यामधील गाळ काढावा, त्यांची दुरुस्ती करावी.

**तुटक व सलग समतल चर**

पाणलोट क्षेत्राच्या माथ्यावरील पडीक जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी सलग समतल चराचा वापर करतात. यासाठी समपातळी रेषेवर ३० सें.मी. खोल व ६० सें.मी. रुंद असे सलग चर खोदावेत. या चरातून निघणारी माती चराच्या खालच्या बाजूस लावावी. त्यामुळे दोन चरांमधील पट्ट्यामध्ये ओलावा दीर्घ काळ राहतो. या ओलाव्याचा फायदा गवताची वाढ चांगल्या प्रकारे होण्यास होते. शिवाय जमिनीवरून वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह थांबविला जातो. चराच्या खालच्या बाजूस जो बांध तयार होतो, त्यावर झाडे लावता येतात. तुटक समतल चर हा सलग समतल चरासारखाच असून, यामध्ये समतल चर हा सलग नसून, तुटक स्वरूपात असतो.

**शेततळे**

पावसाचे वाहून जाणारे पाणी जमा करण्यासाठी आणि त्याचा पुन्हा वापर करण्यासाठी पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळे खोदावे. जमिनीवरून वाहून जाणारे पाणी शेततळ्याकडे वळविण्यासाठी योग्य ठिकाणी गवत लागवड केलेली चारी तयार करावी. शेततळ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यास मदत होते. शेततळ्यास योग्य पद्धतीचे अस्तरीकरण केल्यास त्यामध्ये पाणी जास्त काळ साठविता येते. हे साठविलेले पाणी पिकास आणि फळबागेस निकडीच्या अवस्थेत संरक्षित पाणी म्हणून वापरावे.

**सिमेंट नालाबांध**

सिमेंट नालाबांधामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा अडवून जवळपासच्या विहिरीतील पाण्याची पातळी वाढते. भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्याची गती कमी करून थांबविणे, बांधाच्या प्रभाव क्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे आणि त्याद्वारा सिंचन क्षेत्रात वाढ करणे, हे सिमेंट नालाबांधाचे उद्देश आहेत. सिमेंट नालाबांधासाठी जागेची निवड करताना नाल्याची रुंदी ५ ते ३० मी.पर्यंत असावी, तसेच नाल्याचे पाणलोट क्षेत्र ४० हेक्टरपासून १०० हेक्टरपर्यंत असावे. नाल्याच्या दोन्ही बाजूंस स्थिर काठ असावेत. नाल्याच्या तळाचा उतार तीन टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. नाला काठापासून नाल्याच्या तळापर्यंत कमीत कमी दोन मीटर खोली असावी. नालाबांधाच्या क्षेत्रातील जमिनीचा सामू ६.५ ते ८ च्या दरम्यान असावा, जेणेकरून बांधाशेजारची जमीन चिबडयुक्त होणार नाही. नाल्याच्या दोन्ही बाजूंस म्हणजेच बांधाच्या वरील व खालील बाजूस ३० मी. अंतरावर कोठेही वळण किंवा अडथळा नसावा. सिमेंट नालाबांध गाळाने भरू नये म्हणून पाणलोट क्षेत्रात गाळप्रतिबंधक कामे पूर्ण झालेली असावीत. सिमेंट नाला बंधाऱ्याची साठवणक्षमता अबाधित राखण्यासाठी दर पाच वर्षांनी गाळ काढावा.जलसंधारणाच्या विविध उपायोजनांची राज्यातील शेतकऱ्यांनी अंमलबजावणी केल्यास मृद व जलसंधारणाच्या बरोबरच आपला उत्कर्ष साध्य होऊ शकेल.

### मृद व जलसंधारणाच्या पद्धती

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर हा पाऊसमान, जमिनीचा प्रकार, जमिनीचा उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन इत्यादी बाबी लक्षात घेऊन करावा. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत. या पद्धती अत्यंत परिणामकारक आणि कमी खर्चाच्या आहेत. या पद्धतीमध्ये जागच्या जागी जमिनीत पाणी मुरविले जात असल्यामुळे अभियांत्रिकी मृद व जलसंधारण पद्धतीपेक्षा बाष्पीभवन कमी होते.

### भौतिक पद्धती

अवर्षणप्रवण विभागात ८० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते. या प्रचलित रब्बी पीकपद्धतीमध्ये पावसाळ्यात म्हणजे खरीप हंगामात बहुधा पीक घेतले जात नाही. त्यामुळे खरीप हंगामात जमिनीस पिकाचे पांघरुण मिळत नाही. रब्बी हंगाम हा पिकांचा दुसरा हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो. या हंगामात पिकांना प्रत्यक्ष पावसाचे पाणी फारसे मिळत नाही. खरीप हंगामात पडलेले पावसाचे पाणी भारी खोल जमिनीत खरीप पिके न घेता मुरविले जाते आणि जमिनीतील ओलावा वाढविला जातो. अशा जमिनीत रब्बी हंगामातील पिके चांगली येतात.

### सपाट वाफे

कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही, अशा ठिकाणी उताराला आडवे वाफे तयार करावेत. त्यानंतर बळिराम नांगराने उभे-आडवे ६ मीटर x ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० सें.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठविली जाते.

### सरी वरंबे

मध्यम ते भारी जमिनीत बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावे. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्यांमधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यांपर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून माती वाहून जात नाही. सऱ्यांची लांबी साधारणतः ९० मीटरपर्यंत ठेवावी. या पद्धतीमुळे उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ दिसून येते.

### बंदिस्त सरी वरंबे

या पद्धतीत मुख्य वरंबे उताराला आडवे ठेवावेत, तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात. मुख्य वरंब्याची उंची ६ मीटर व उंची ३० सें.मी. ठेवावी, तर बंदिस्त वरंब्याची उंची २० सें.मी. व दोन वरंब्यांतील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून, त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. मृद व जलसंधारणाची अभियांत्रिकी कामे मूलस्थानी जलसंधारणाच्या कामांबरोबरच मृद व जलसंधारणाचे अभियांत्रिकी उपचार पाणलोट क्षेत्र विकासाच्या माथा ते पायथा या सूत्रानुसार करावेत.


**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**


# राष्ट्रीय एकात्मता, शांतता आणि सलोखा महत्वाचा

## आज राष्ट्रीय सद्भावना दिवस



भारतात दरवर्षी २० ऑगस्ट रोजी सद्भावना दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता, शांतता आणि सलोखा वाढवण्यासाठी पाळला जातो. राजीव गांधी यांचा जन्म २० ऑगस्ट १९४४ रोजी झाला. त्यांच्या मृत्यूनंतर १९९२ मध्ये भारताच्या केंद्र सरकारने त्यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून घोषित केली. देशात प्रेमाची आणि एकतेची भावना टिकवणे हा यामागील मुख्य उद्देश होता. समाजात सर्व धर्मांच्या लोकांमध्ये शांतता आणि सद्भावना वाढवणे. जात, धर्म, भाषा किंवा प्रांतांचे भेद मिटवून एकत्र राहणे. कोणत्याही वादावर प्रेमाने आणि संभाषणाने तोडगा काढणे. सरकारी कार्यालये, शाळा आणि संस्थांमध्ये प्रतिज्ञा घेतली जाते.सर्व नागरिकांमध्ये आपुलकी राहावी म्हणून विविध कार्यक्रम घेतले जातात. राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना 'राजीव गांधी सद्भावना पुरस्कार' दिला जातो.

आपल्या देशाचे सातवे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती आहे. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २० ऑगस्ट रोजी सद्भावना दिन साजरा करण्यात येतो. देशाचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या निधनानंतर १९९२ मध्ये काँग्रेसने राजीव गांधी सद्भावना पुरस्काराची स्थापना केली होती. हा दिवस राष्ट्रीय सद्भावना आणि सांप्रदायिक मैत्री वाढवण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. इंग्रजीत 'सद्भावना' या शब्दाचा अर्थ 'सुसंवाद' असा होतो. राजीव गांधी हे देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. विकसित राष्ट्राचे त्यांचे स्वप्न होते. ज्याचे नेतृत्व त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांतून केले. विविध धर्म आणि भाषांच्या लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सांप्रदायिक संबंध वाढवणे असे त्यांचे ध्येय होते. हा दिवस भारतातील सर्व जाती, पंथ आणि धर्माच्या लोकांमध्ये दीर्घकालीन शांतता आणि सांप्रदायिक प्रोत्साहन देऊन प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करतो. यंदाच्या वर्षी सद्भावना दिनानिमित्त विविधतेचा स्वीकार करणे, मतभेदांचा आदर करणे आणि राष्ट्र उभारणीच्या समान उद्दिष्टासाठी एकत्र काम करणे याच्या महत्त्वाच्या गोष्टींवर भर दिला जात आहे. राजीव गांधी १९८४ ते १९८९ पर्यंत भारताचे पंतप्रधान झाले.

### राजीव गांधी राष्ट्रीय 'सद्भावना' पुरस्कार

हा पुरस्कार दरवर्षी अशा व्यक्तींना दिला जातो ज्यांनी शांतीची भावना समजून घेण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. आतापर्यंत लता मंगेशकर, शुभा मुदगल, सुनील दत्त, अमजद अली खान, मोहम्मद अझरुद्दीन, गोपालकृष्ण गांधी यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराची स्थापना पंतप्रधान राजीव गांधी यांच्या सन्मानार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अखिल भारतीय संसदीय आयोगाने १९९२ मध्ये केली होती.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष निखिल ठाकरे यांचा भव्य सत्कार

प्रतिनिधी २० ऑगस्ट



**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांच्या आदेशाने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांचे विचार तळागाळातील प्रत्येक युवकापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने विदर्भपुत्र निखिल दादा ठाकरे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. निखिल दादा ठाकरे यांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील युवकांमध्ये मोठा आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून राष्ट्रवादी युवक काँग्रेसला नवी ऊर्जा व बळ मिळणार असल्याची भावना युवकांमधून व्यक्त होत आहे. निखिल दादा ठाकरे यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर अमरावती येथील त्यांच्या निवासस्थानी अकोला महानगर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष विजयभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महानगराध्यक्ष अजय मते यांनी त्यांचा भव्य सत्कार करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी अकोल्यासह संपूर्ण विदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसची युवकांची फळी अधिक जोमाने, संघटितपणे व ताकदीने कार्य करणार असून स्वर्गीय अजित दादा पवार यांचे विचार सर्वसामान्य व तळागाळातील युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिली. या भव्य सत्कार प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ पदाधिकारी बुढन गाडेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अजय कांबळे, अब्दुल नईम, अविनाश इंगळे, नितीन क्षीरसागर, मोहम्मद फिरोज, मंगेश इंगळे, शेख मुस्ताक, मंगेश चोपडे, राहुल कावळे, अंकित आपोतीकर, योगेश कवडे, सोशल मीडिया अध्यक्ष गौरव चव्हाण, यश तायडे, दर्शन खेडकर, निखिल राठोड, अमरीश गावंडे, सौरभ टेकाळे, विजय धनवाडे, तुषार अग्रवाल, प्रफुल निकम, रोहित पाटील आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष निखिल दादा ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसची संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत होईल, विदर्भातील युवकांना नवी दिशा व प्रेरणा मिळेल आणि पक्षाचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी युवकांची ताकद अधिक प्रभावीपणे उभी राहील, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# लाचलुचपतच्या कारवाईतील 'ठाणेदार' संशयाच्या भोवऱ्यात!

## पैसे ठाणेदाराच्या नावाने अन् कारवाई मात्र पीएसआयवरच

## तक्रारदाराने अकोल्यात नाही केली तक्रार वाशिम मध्ये केली तक्रार

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला :** राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून वाईन बारसाठी एनओसी मिळवून देण्याच्या मोबदल्यात ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना चान्नी पोलीस स्टेशनचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक महादेव देशमुख यांना वाशिम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी रंगेहात पकडले. मात्र, या कारवाईनंतर पोलीस वर्तुळात आणि नागरिकांमध्ये एकाच चर्चेने जोर धरला आहे.'लाचेची रक्कम ठाणेदारासाठी असल्याचे निष्पन्न झाले असतानाही चान्नीच्या ठाणेदाराला मोकाट का सोडले ?' असा प्रश्न अनुत्तरीत आहे. तर तक्रारदाराने अकोल्यात तक्रार न करता वाशिम गाठल्याने अनेकांनी भुवया उंचावल्या.

पातूर तालुक्यातील मळसूर येथील ३० वर्षीय शेतकऱ्याने आपल्या 'भूमिपुत्र बीअर अँड वाईन शॉप'च्या जागी वाईन बार सुरू करण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जाच्या पोलीस पडताळणी अहवालासाठी चान्नी पोलीस स्टेशनचे पीएसआय महादेव देशमुख यांनी ठाणेदार दराडे यांच्यासाठी ३० हजार आणि स्वतःसाठी ५ हजार, अशी एकूण ३५ हजार रुपयांची लाच मागितली. मंगळवार १८ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३७ च्या सुमारास चान्नी पोलीस ठाण्याच्या गोपनीय कक्षात ही ३५ हजारांची लाच स्वीकारताना देशमुख यांना ट्रॅप करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणात लाचेचा मोठा वाटा अर्थात ३० हजार रुपये ठाणेदार साहेबांसाठी मागण्यात आला होता, हे पडताळणीत समोर आले आहे. असे असतानाही केवळ पीएसआय देशमुख यांच्यावरच गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने एसीबीच्या कारवाईवरच प्रश्न निर्माण होत आहेत.

एसीबीने १२ ऑगस्ट रोजी ठाणेदार दराडे यांची पडताळणी केली असता ती 'नकारात्मक' आल्याचे सांगण्यात आले. परंतु, वरिष्ठ अधिकाऱ्याचा वरदहस्त किंवा संमती असल्याशिवाय दुय्यम अधिकारी इतक्या मोठ्या रकमेची मागणी ठाणेदाराच्या नावाने करू शकतो का. लाचेची मूळ मागणी ठाणेदाराच्या नावावर झालेली असताना केवळ पीएसआयलाच बळीचा बकरा बनवून ठाणेदारांना क्लीन चीट देण्याची घाई एसीबीने का केली, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

## मुर्तिजापूरच्या विकासासाठी खासदारांकडे पाठपुरावा



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**मुर्तीजापूर :** फोटो मुर्तीजापुर नगर परिषदेच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण आणि गतिमान विकास व्हावा, या उद्देशाने नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष लखन अरोरा यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन शहरातील विविध विकासकामे व प्रलंबित नागरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. शहराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य आणि शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

मुर्तीजापूर शहराची वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेता रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, सार्वजनिक सुविधा तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाशी संबंधित अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

## अकोटमध्ये घरात सुरु असलेल्या कथित कत्तल खान्यावर पोलिसांची धडक कारवाई



### ६० किलो गोमांस जप्त, दोन बैलांची सुटका

वि.प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोट :** शहरातील कुरेशीपुरा परिसरातील एका घरामध्ये कथितरित्या सुरू असलेल्या बेकायदेशीर गोवंश कत्तलीवर अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या पथकाने गुरुवारी धडक कारवाई केली. या कारवाईत सुमारे ६० किलो गोवंशाचे मांस, दोन जिवंत बैल तसेच कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले.

२० ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या आदेशानुसार विशेष पथक शहर परिसरात नियमित पेट्रोलिंग करीत होते. गुप्त बातमीदारामार्फत कुरेशीपुरा परिसरातील एका घरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. घराच्या समोरील खोलीत एक इसम गोवंशाच्या मांसासह आढळून आला. त्याच ठिकाणी दोन जिवंत बैल आखूड दोराने बांधून ठेवलेले असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. हे दोन्ही बैल कत्तलीच्या उद्देशाने ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# अटलबिहारी वाजपेयींना भावपूर्ण आदरांजली

### आमदार हरीश पिंपळे यांनी जागविल्या भावनिक आठवणी

प्रतिनिधी २० ऑगस्ट



**मूर्तिजापूर :** स्थानिक आशीर्वाद लॉन तिडके नगर येथे अटल फाउंडेशन राष्ट्रीय अध्यक्ष अपर्णा सिंह, प्रदेशाध्यक्ष गणेश राजे यांच्या सूचनेनुसार प्रदेश महामंत्री विष्णू लोडम जिल्हाध्यक्ष रूपाली तिडके यांच्या संकल्पनेतून फाउंडेशन कार्याध्यक्ष कवयित्री डॉ. स्वाती पोटे व सृजन साहित्य संघाचे रवींद्र जवादे यांचे मार्गदर्शनाखाली माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार हरीश पिंपळे तर प्रमुख अतिथी म्हणून संत गजानन महाराज संस्थेच्या नूतन पिंपळे, ज्ञान नर्मदा बहुउद्देशीय संस्थेच्या सुनिता लोडम, राज्य परिषद सदस्य भाजपा राजकुमार नाचणे, युवा उद्योजक प्रशांत हजारी, भूषण कोकाटे, अविनाश यावले, तालुकाध्यक्ष आरती पोळकट, नगरसेवक गजानन नाकट, रुग्ण कल्याण समितीचे सुनील लशुवानी, सुभाष गोसावी, रितेश सबाजकर, सुभाष गोसावी, समाजसेवक गजानन पोळकट, प्रमोद टाले अविनाश बांबल, विनोद देवके उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न मा पंतप्रधान स्व अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली यावेळी अटल फाउंडेशन च्या वतीने मरणोत्तर देहदानाचा संकल्प करणारे समाजसेवक दामोदर गुल्हाने, प्रा. सुधाकर गौरखेडे यांचा शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

भारतरत्न, माजी पंतप्रधान स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य अटल राष्ट्रगर्जना काव्यसंध्या' अटल प्रेमाचे राष्ट्र सूर या कवी संमेलनाच्या माध्यमातून वाजपेयींना स्वरांजली आणि काव्यांजलीद्वारे भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या भव्य कार्यक्रमात डॉ स्वाती पोटे सृजन साहित्य संघाचे रवींद्र जवादे मीना जवादे दिनकर ठाकरे सुनील ठाकूर विमल सरोदे राजेंद्र भटकर सुनील ढोकणे अमीर हुसेन कमल नारायण जयस्वाल राम कृष्ण आसरे विनोद महल्ले यांनी आपल्या राष्ट्रभक्तीपर रचनांनी संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार हरीश पिंपळे यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या अलौकिक कर्तृत्वाला उजाळा दिला. "अटलजींच्या स्वप्नातील समर्थ आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी त्यांनी दाखवलेल्या विचारांच्या आणि तत्त्वांच्या मार्गावर चालणे हेच त्यांना पुण्यतिथीनिमित्त खरी आदरांजली ठरेल," असे प्रतिपादन केले. त्यांच्या अस्तीकलश विसर्जनाच्या वेळेस घडलेल्या भावनिक स्मृतींना उजाळा दिला.

# किड्स प्लॅनेट्स स्कूलमध्ये भारतीय सैन्याचा गौरव

वि. प्रतिनिधी २० ऑगस्ट





**अकोट :** स्थानिक किड्स प्लॅनेट्स स्कूलमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय सैन्यात कार्यरत असलेले विकास बोदडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पत्रकार योगेश लबडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच देशभक्तीचा संदेश देणारी प्रभावी भाषणे सादर केली.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले देशभक्तीपर समूह नृत्य. विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण आणि आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या नृत्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्याचे शौर्य, जवानांचे बलिदान आणि देशसेवेचे महत्त्व याविषयी विचार व्यक्त केले. भारतीय सैन्यात कार्यरत असलेले अध्यक्ष विकास बोदडे यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना देशसेवेची प्रेरणा मिळाल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शिक्षिका मनिषा डीक्कर यांनी केले. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रितू अढाऊ, स्कूल डायरेक्टर प्रा. मनीष अढाऊ, सायन्स हेड विशाल सरोदे, परीक्षा विभाग प्रमुख श्याम थारकर, क्रीडा शिक्षक मांडले तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## हिवरखेड परिसरात केळीचे दमदार उत्पादन

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**हिवरखेड :** परिसरात केळी पिकाचे चांगले उत्पादन दिसत आहे. तरुण शेतकरी शेतीकडे वळलेले दिसतात. त्यांनी आता नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा आपल्या शेतकरी आईवडीलाला शेतीच्या माध्यमातून सहकार्य करावे असा निर्धार केला आहे. गावातील मोराडी शेतशिवारात तरुण शेतकरी दीपक हिवराळे यांनी २ एकर शेती मध्ये केळी पिकाचे उत्पन्न काढले असून पहिल्या केळी कटन मध्ये १६०० कॅरेट केळी उत्पादन काढले. यावेळी निसर्ग कृषी सेवा केंद्राने योग्य सल्ला दिला तर दुसऱ्या टप्यात यामध्ये आणखी १५०० से क्रॅरेट शेती उत्पन्न काढण्याची क्षमता यांनी शेतकऱ्याच्या मेहनतीतून अंदाजे दर्शवली आहे.

# अकोला रेल्वे स्थानकावर पोलिसांची मॉक ड्रिल

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला :** अकोला रेल्वे स्थानकावर एका उभ्या ट्रेनमध्ये बेवारस व संशयास्पद बॅग आढळून आल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि प्रवाशांमध्ये एकच घबराट उडाली.

घटनेचे गांभीर्य ओळखून अवघ्या काही मिनिटांत अकोला पोलिस दलाचा मोठा ताफा, बॉम्ब शोधक-नाशक पथक आणि श्वान पथक रेल्वे स्थानकावर दाखल झाले. पोलिसांनी तत्काळ संपूर्ण परिसर ताब्यात घेऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने रेल्वे स्टेशनला वेढा घातला.

अकोला रेल्वे स्थानकावर पोलिसांची धावपळ आज दूपारी पाहण्यासारखी होती. यामुळे काही काळ या भागात तणावाचे वातावरण होते. ही कोणतीही प्रत्यक्ष दहशतवादी घटना किंवा धोक्याची घंटा नसून अकोला पोलिसांची ही एक नियोजनबद्ध 'मॉक ड्रिल' होती. कोणत्याही आपत्कालीन किंवा सुरक्षेच्या आव्हानात्मक परिस्थितीला तोंड देण्यासाठी अकोला पोलिस दल किती तत्पर, सतर्क आणि स्फूर्तीने काम करते, याची तपासणी करण्यासाठी या मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. या धडक कारवाईत पोलिसांचा प्रतिसाद वेळ अत्यंत उत्तम नोंदवला गेला. बॉम्ब शोधक पथकाने संशयास्पद बॅगची तपासणी करून ती सुरक्षितपणे ताब्यात घेण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेले हे ऑपरेशन पाहून सुरुवातीला प्रवाशांचा थरकाप उडाला होता; मात्र ही केवळ मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट होताच सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अकोला पोलिस प्रशासनाने नागरिकांना व प्रवाशांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि न घाबरण्याचे आवाहन केले आहे.

## डासांच्या वाढत्या प्रादुर्भावावर फवारणी सुरु

### शिक्षण सभापती सरिता पाटील यांच्या मागणीला यश



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**मूर्तीजापूर :** शहरात पावसाळ्यामुळे डासांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील यांनी नगर परिषदेकडे केली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत शहरातील विविध भागांत डास प्रतिबंधक फवारणी सुरू करण्यात आली आहे.

शहरात काही दिवसांपासून पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचत असून, त्यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. परिणामी नागरिकांमध्ये डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली होती. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक असल्याने तातडीने फवारणी करण्याची मागणी करण्यात आली होती.या संदर्भात शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील यांनी मूर्तीजापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष हर्षलभाऊ साबळे तसेच मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन साद करून शहरात डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्याची मागणी केली होती. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियमित फवारणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले होते.

या मागणीची दखल घेत नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी शहरात डास प्रतिबंधक फवारणी करण्यास मंजुरी दिली. त्यानंतर नगर परिषद प्रशासनाच्या वतीने शहरातील विविध परिसरात फवारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

# शिवपुर यात्रेत ढोल नगारेच्या गजरात श्री चैनूजी महाराजांचा जयघोष





पवन बेलसरे २०ऑगस्ट

**अकोट :** तालुक्यातील सातपुड्यात वसलेले शिवपुरवासीयांचे ग्रामदैवत श्री चैनुजी महाराज यात्रेची ६७ वर्षाची परंपरा जोपासत उत्सवात हजारो भाविक महाप्रसाद व दर्शनासाठी दाखल झाले. नागपंचमीच्या दिवशी भव्य दिव्य सोहळ्यात पावसाने हजेरी लावली.

श्री चैनुजी महाराज महाराजांची आख्यायिका असून यात्रेत नागपंचमीला मंदिरात तीर्थ स्थापना पंचमंडळी तसेच गावकरी भाविक यांच्या हस्ते पूजन झाले. यात्रेमध्ये उमरा येथील मानाची पालखी श्री वाकाजी महाराज देवस्थान मधून वाकाजी महाराज सांस्कृतिक भजनी मंडळ यांच्या पुढाकारात मंदिरात सकाळी दाखल झाली. अशा दोन पालख्या या यात्रेमध्ये आकर्षण होत्या. भाविकांच्या अंगामध्ये सवारीचे पान लागून जमिनीवर घुसरत मंदिरात अंगारा घेऊन पान अंगातील सवारी सोडण्याकरता पोचतात मोठमोठ्या सवाऱ्या डोळ्यांचे पारणे फिटते.

महाराजांच्या दोन पालख्यांचे सजवलेले आकर्षण नागदेवतेची मूर्त विराजमान असलेल्या पालखी सोहळ्याचे भाविक दर्शनासाठी लांब रांगा लागतात व पालखीचे सर्व गावांमधून प्रत्येक दारोदार आरत्या फुलपुष्पगुच्छ यांनी वाहून जंगी स्वागत करून दर्शन घेतले. भाविक मनोकामना पूर्ण व्हावी त्यासाठी पालखी खालून परिवारातील लहान मुला बाळा सहित लोटांगण दर्शन घेतात तेथील अंगारा व तीर्थाला आजही खूप मोठा साक्षात्कार मानला जातो नागपंचमीला बेल फुल फुटाणे व नारळ वाहण्याची आजही प्रथा आपल्याला इथे पाहायला मिळते. संपूर्ण गावांमधून वाजत गाजत मंदिर परिसरात दाखल होऊन गोपाल महाराज खवले यांचे गोपाल काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाला सुरुवात झाली. श्रद्धेपोटी ज्यांना सापाचा दंश झाला असता त्यांना मंदिरामध्ये नेऊन विहिरीतील पाण्याने अंघोळ करून सर्पदंश झालेला व्यक्ती च्या अंगातील विष उतरून जाते व त्याला नवीन जीवनमान प्राप्त होते.

विविध रुपी महाराजांची अनुभवांची गाथा आहे नागदेवते ची प्रतीक म्हणून आजही त्याच जागेवर त्रिशूल निघालेले आहेत आणि नागदेवतेच ठाणे पिंड महाकाय त्रिशूल सुद्धा राहणापूर रोडवर आजही स्थानबद्ध झालेल आहे,समोरच महापौराणिक शिवकालीन शिवपिंड आहे. यात्रेच्या वर्गणीसाठी गावामधून एकर भर शेतावर १२५ रुपये पावती आकारण्यात येते. ती वर्गणी पावती गावातील मजूर व शेतकरी हे स्वतः मंदिरात आणून देतात अन्न शिजवायला सर्व गावकरी ट्रॅक्टर घेऊन पहाडातील इंधन आणतात सर्व स्वयंपाक हा चुलीवरच केल्या जातो यात्रेला आठ क्विंटल हिरवी मिरचीची भाजी व ३५ क्विंटल ची. पोळ्या गावांमध्ये गायवाडा पटांगण अशा मोठ्या असलेल्या जागेवर महिलावर्ग चुलीवर पोळ्या बनविण्यात लाखो भाविक भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला. ग्रामपंचायत प्रशासनाकडून यात्रेसाठी व भाविकांसाठी उपाय योजना राबविण्यात आल्या होत्या या यात्रेत मोठ्या संख्येत भाविक दाखल होत असतात. कुठलाही अनुसूचित प्रकार घडूनही त्याकरता अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे श्रीधर गुट्टे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनात चोख संध्याकाळपर्यंत बंदोबस्त लागला होता.

## निधन वार्ता

**सौ. उषाताई डोंगरे**



**अकोट :** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथील सेवेकरी सौ. उषाताई गजानन डोंगरे यांचे आज 20 ऑगस्ट रोजी पहाटे 4.00 वाजता निधन झाले.

त्यांच्या निधनामुळे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र तसेच अकोट परिसरातील सेवेकरी परिवारावर शोककळा पसरली आहे.

## Change Name

I WANT TO CHANGE MY FATHER NAME IS MY OLD PASSPORT NUMBER J4351639. MY OLD FATHER NAME WAS **GHANIWALE YASIN** NOW MY FATHER NAME IS **YASIN KASAM GHANIWALA** ADDRESS:- KACCHI LINE, MAIN ROAD, OLD CITY, MURTIZAPUR. DISTRICT:- AKOLA (MAHARASHTRA) PIN:- 444107.

# "एसआयआर" मधून वगळलेल्यांना पुन्हा नाव दाखल करण्याची संधी

## यादीतील सुधारणेसाठी बीएलओशी संपर्क साधावा - आ. सुलभाताई खोडके

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती:** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमात जिल्ह्यातील ३ लाख ३० हजार ४०१ मतदार वगळण्यात आले आहेत. त्यात अमरावती विधानसभा मतदार संघातील ७५,६३७ मतदारांचा समावेश आहे. वगळण्यात आलेल्या मतदारांच्या नावाची यादी amravati.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नावे दुबार असल्यामुळे व काही स्थलांतरीत तर काही नोंदणीवेळी अनुपस्थित असल्याने नावे वगळण्यात आली आहे. यापैकी पात्र नागरिकांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे. ही संधी २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर अशी महिनाभर सुरु राहील. वगळलेल्या मतदारांच्या यादीत नाव असल्यास तसेच यादीतील नाव सुधारणेसाठी तातडीने बीएलओंशी संपर्क साधावा, असे आवाहन आमदार - सौ.सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रासह अमरावती जिल्ह्यात मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यासह अमरावती विधानसभा मतदार संघात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ब्लॉक लेवल ऑफीसर ( बि.एल.ओ) यांनी मतदारांच्या घरभेटी घेत प्रत्येकाकडून संपूर्ण माहितीनिशी गणना अर्ज भरून घेतला. अर्जाची खातरजमा करून ती नावे डीजीटल



पद्धतीने संगणकीकृत करण्यात आली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात ३,७५,३९३ मतदार असून एस.आय. आर. मॅपिंग प्रक्रियेनंतर २,९९,४२६ नव्या यादीत स्थान मिळाले आहे. तर ७५,६३७ मतदारांची नावे वगळण्यात आले आहे. या मतदारांमध्ये मृत, दुबार नावे, स्थलांतरीत आणि इतर कारणांनी मूळ जागी न राहणाऱ्यांचा समावेश आहे. ज्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली, त्यांची यादी आगामी २४ ऑगस्ट रोजी अमरावती तहसील कार्यालयात जाहीर केली जाणार आहे. शिवाय यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी म्हणून नव्याने नाव नोंदवण्याची संधी म्ह्णून २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर असा महिनाभराचा कालावधी देण्यात आला आहे. अमरावती विधानसभा मतदार संघातील एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही. यासाठी सर्व नागरिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी यांनी यादीचे अवलोकन करावे. पात्र मतदाराचे नाव पत्ता सापडला नसल्यास किंवा 'अनकलेक्टेड' वर्गवारीमध्ये समाविष्ट झाले असल्यास अथवा त्यांनी गणनापत्रक जमा केले नसल्यास, त्यांनी त्वरित संबंधित बीएलओशी संपर्क साधून गणनापत्रकात अचूक माहितीसह भरावी, तसेच गणना पत्रक जमा करावे, असे आवाहन आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन: मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. मतदान प्रक्रियेत सुलभता आणि अचूकता आणण्यासाठी "एसआयआर हा सर्वांसाठी अनिवार्य करण्यात आला. बिएलओ व त्यांना सहकार्य कारणाने सहायक व राजकीय पक्षांचे प्रतिनिधि यांनी दरम्यानच्या काळात आपल्या बूथनिहाय मतदारांच्या गृहभेटी घेऊन त्यांची पडताळणी केली. मात्र काहींना वारंवार संपर्क करुनही त्यांनी एसआयआरचा गणना अर्ज भरुन देण्यास नकार दिला. काही अनुपस्थित राहिले, त्यामुळे त्यांची नावे नव्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली नसून ती वगळलेल्यांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे आता नव्याने नाव दाखल करण्याची संधी देण्यात आली असून नागरिकांनी आपल्या बीएलओंची भेट घेऊन एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच यादीच्या सुधारणेसाठी सहकार्य करावे, या संदर्भात काही अडचणी असल्यास अमरावती विधानसभा मतदार संघातील मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच बीएलओ पर्यवेक्षक अथवा मतदार केंद्रस्तरीय अधिकारी किंवा आमचे हेल्पलाईन नंबर ८३०८०८००८८, ७३८७२६६९७०, ७४१०७७०६३५ ,७३८५२१५३९५, ९९७५२०५२००, ९३७१८१८७८४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# रोही, नीलगाय जंगली प्राण्यांमुळे शेतकरी त्रस्त

## युवा स्वाभिमान, व शेतकऱ्यांची, विभागीय आयुक्तांना निवेदन

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रोही, नीलगाय, रान डुकरे व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीचे प्रचंड प्रमाणात होत असलेले यामुळे मानव जीवितहानी आणि शेतीचे होत असेल नुकसान व वन्य प्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याबाबत युवा स्वाभिमान पार्टीने विभागीय आयुक्तांना निवेदन दिले आहे.



जिल्ह्यातील वन्य प्राण्यांमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या वतीने आम्ही खालील सही करणार निवेदन सादर करतो की, रोही,नीलगाय ,रानडुकरे व अन्य वन्य प्राण्यांमुळे अमरावती जिल्ह्यातील 14 तालुक्यांपैकी बारा तालुक्यांमध्ये प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांचे शेतीमधील उभ्या पिकांचे नुकसान होत आहे. एवढेच नव्हे तर अमरावती ते चांदूरबाजार मार्ग अमरावती ते दर्यापूर मार्ग अमरावती परतवाडा मार्ग अमरावती ते भातकुली मार्गे दर्यापूर मार्ग अमरावती ते कुऱ्हा मार्ग अमरावती ते मोर्शी मार्ग अशा प्रत्येक मार्गावर रोही व वन्य प्राण्यांची वजा वाढल्यामुळे प्रचंड प्रमाणात रस्ते अपघाताचे प्रमाण वाढले असून प्रत्येक जण याबाबतीत चिंतेत आहे.

शेतकरी विरोधी असलेला वन कायदा आजच्या स्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या जीवित आवर घेतलेला आहे त्यांचे पिके पण नष्ट होत असून जीविताची कोणतीच गॅरंटी नसल्याचे सध्याचे चित्र आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार आपले निवेदने प्रशासनापुढे मांडले असताना सुद्धा त्याची साधी दखल घेतल्या जात नाही ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे, तरी आपण जिल्ह्याचे प्रमुख या नात्याने यासंदर्भात शेतकऱ्यांच्या हितास्त निर्णय घ्यावा अशी विनंती आम्ही आपणास निवेदनाद्वारे करीत आहे.

रोहींच्या प्रजनन क्षमतेचा अल्प कालावधी असल्यामुळे रोही व इतर वन्य प्राण्यांच्या बाबतीत नसबंदी सारखी उपाय योजना करणे., वन्य प्राण्यांना सामूहिक पणे एकत्रित करून सुरक्षित जंगलात क्लब करणे. . वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे शेतीचे झालेल्या नुकसानीचा शंभर टक्के नुकसान भरपाई खर्च मिळणे., शेतकऱ्यांना सामूहिक कुंपण योजनेसाठी शासन स्तरावर शंभर टक्के अनुदान देण्यात यावे.

यावेळी सुनील राणा, प्रकाश साबळे, उमेश ढोणे, आशिष कावरे, देवानंद राठोड, गंगाधर श्रीखंडे, शेखर अवघड, मंगेश इंगोले, तुषार पडोळे, चेतन पाथरे, विश्वंभर मारके, अमित कुचे, रुपेश कळसकर, संजय डहाणे, बाबाराव केव्हरकर, सचिन केव्हरकर, संजय लोखंडे, विजु लोखंडे, मंगला लोखंडे, मंगला लोखंडे, अशोक घाटोळ, रामकृष्ण खवले, गोपाल जयस्वाल, जगदीश जनारकर, मनिश हिवे, दिनेश टाकरखेडे, देवानंद सोळंके, दिनेश सिनकर, दिलीप ठाकरे यांची उपस्थिती होती.

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती:** पोलीस स्टेशन धारणी कडुन अवैध शस्त्र बाळगणा-या आरोपी विरुध्द कलम ४, २५ आर्म अॅक्ट सह कलम १३५ मुबंई पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंदकरून धडक कारवाई करण्यात आली.

निकेतन कदम, पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांनी अवैदय धंदयावर कारवाई करणे बाबत तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुध्द धडक करवाई करण्याचे आदेशीत केले आहे.



दिनाक १८/०८/२६ रोजी ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांना मिळाल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन धारणी येथील पथकाने ग्राम बैरागड येथे एका इरा पास अवैधरित्या तलवार बाळगतांना व दहशद माजवतांना पंचासमक्ष ताब्यात घेतले सदर इसमाचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख राहील शेख रहीस वय २१ वर्ष रा. बैरागड ता धारणी असे सांगीतले त्याच्या ताब्यातील तलवार हिसकावून घेण्यात आली सदर तलवारची लांबी २३.५ सेली व रूदी ३ सेमी इतकी असुन ती पंचासमक्ष कायदयानुसार जप्त करण्यात आली आहे अधिक मानवतो घेतली असता सदर' इसमाने त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी सदर तलवारीने केक कापल्याचे माहीती मिळाली आहे. सदर इसमावर कलम ४,२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मुबंई पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास सफौ/९९८ प्रकाश गिरडकर हे करत असे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलि अधिक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, माधवराव रुड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण, प्रकाश गिरडकर सतीश मोहन राठोड, पोहवा, सुमीत घोटेकर, पोक गजानन लामबीक, चापोहेकॉ नितीन लोहकपुरे ब.न व इतर कर्मचारी अशांनी केली आहे.

# बी.डी.एस. हायस्कूलमध्ये देशभक्ती गीतावर कवायत सादरीकरण

प्रतिनिधी 20 ऑगस्ट

**चांदूर रेल्वे:** श्री. शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय चांदूर रेल्वे येथे 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य डॉ.अतुल ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्याध्यापक अशोक मोटघरे, माजी कर्मचारी विलास ठाकरे, सुनील इंगळे, ज्येष्ठ शिक्षिका एस. बी. देशमुख, एस.डी. फुके, डी. डी. राठोड, पवन देशमुख उपस्थित होते.



सुरुवातीला शाळेचे प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर वंदे मातरम, राष्ट्रगीत व राज्य गीत घेण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी यावेळी देशभक्ती गीतावर सुंदर असे कवायत सादरीकरण केले व सामूहिक देशभक्ती गीत गाण्यात आले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांची भाषणे व देशभक्ती गीतावर सांस्कृतिक नृत्य सादर केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून यावेळी वर्ग 5 ते 12 मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापक अतुल ठाकरे यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत स्वातंत्र्य दिनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालक शारीरिक शिक्षक एस.टी. तायडे यांनी केले तर आभार संजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# धारणीत महारक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**धारणी** : १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पावनपर्वावर वीर शहिदांना अभिवादन करण्यासाठी धारणी येथील रंगभवन मैदानावर शहिदांच्या नावे महारक्तदान शिबिर घेण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभाग व मद्यविक्रेता संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, पंचायत विभाग, सिंचन विभाग, बांधकाम विभाग, पोलीस विभाग व इतर विभागा णी मोलाचा आप आपल्या स्तरावर संपर्क साधून जास्तीत जास्त



म्हणजेच तब्बल १११ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना अनोखी श्रद्धांजली अर्पण केली. सहायक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला, मुख्याधिकारी अविनाश कुटे, नगरपंचायत अध्यक्ष सुनील श्यामलाल चौथमल, गटनेते पंकज मोरे, रक्तदान शिबिराला भेट देताना नगराध्यक्ष श्यामलाल चौथमल व अन्य.यांची उपस्थिती होती. पोलिस प्रशासनाने सहकार्य केले.आरोग्य विभागाच्या पथकाने रक्त दात्यांची तपासणी करून रक्त संकलनाची व्यवस्था केली. सुमित चौथमल, विशाल मालवीय, रोहित पाल यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांचे लॅपटॉप व मोबाईल चोरी करणारे 2 आरोपी ताब्यात

## गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी 20 ऑगस्ट

**अमरावती:** स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-या विदयार्थ्यांचे लॅपटॉप व मोबाईल चोरी करणारे 2' आरोपी ताब्यात घेवून गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई शहर गुन्हे शाखेने केली आहे.

पो.स्टे. गाडगेनगर अमरावती येथे फिर्यादी नामे प्रतिक्षा प्रल्हादराव शिरपुरकर, वय २५ वर्षे, रा.हल्ली मुक्काम गाडगेनगर यांनी फिर्याद दिली की, त्या शिक्षणा करीता गाडगेनगर, अमरावती येथे भाडयाने राहात असून दिनांक ११/०५/२०२६ रोजी अज्ञात ईसमाने फिर्यादी यांचे उघडया रुम मधून २ लॅपटॉप व ३ मोबाईल हॅण्डसेट चोरुन नेले आहेत. अशा फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे अपराध क्रमांक ५२४/२६ कलम ३०५ (a) भा. न्या. स चा गुन्हा नोंद होता.

गुन्हा घडल्यापासून गुन्हे शाखा, अमरावती



शहर हे सदर गुन्हयाचा संमातर तपास करीत होते. घटनास्थळावरील तसेच इतर सि.सि. टी. व्ही. फुटेज चेक करण्यात आले व तांत्रिक माहीती प्राप्त करण्यात आली तसेच बातमीदार यांना सक्रीय करण्यात आले असता दिनांक १८/०८/२०२६ रोजी गुप्त बातमीदार यांचे कडून माहिती मिळाली की, एक ईसम हा ईतवारा बाजार परिसरात हीरो स्प्लेंडर गाडीसह एका लाल रंगाचे लॅपटॉप बॅगमध्ये लॅपटॉप घेवून विक्रीकरीता येणार आहे. अशा खात्रीशीर माहीती वरुन गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार असे ईतवारा बाजार येथे सापळा रचून सदर ईसमाचा शोध घेत असता एक ईसम हा काळया रंगाच्या हीरो स्प्लेंडर मोटर सायकलवर लाल रंगाचे कापडी कव्हर असलेला लॅपटॉपसह दिसून आला. त्यास त्याचे नाव-गांव विचारुन व त्याचे जवळ असलेला नमुद वर्णनाचा लॅपटॉप ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कडे ३ मोबाईल मिळून आले. सदर व्यक्तीचे ताब्यात मिळून आलेल्या लॅपटॉप व मोबाईलचे बिल बद्दल विचारणा केली असता त्याने उडवा-उडवीचे उत्तरे दिली. त्यावरुन त्यास विश्वासात घेवून लॅपटॉप तसेच मोबाईल हॅण्डसेट बाबत बारकाईने विचारपूस केली असता सदर लॅपटॉप व मोबाईल हॅण्डसेट हे त्याने अंदाजे ३ महिन्या अगोदर गाडगेनगर हद्दीतून चोरी केल्याचे कबूल केले. तसेच त्याच ठिकाणावरुन मी आणखी एक लॅपटॉप व दोन मोबाईल फोन चोरी केले होते ते माझे परिचीत राहणार जमीला नगर, ईमाम नगर, अमरावती याचेकडे विक्री करीता ठेवलेले आहे. वरुन दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले व त्यांचे कडून गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी निखिल विलास ताठे, वय २१ वर्षे, रा. गाडगे महाराज शाळे जवळ, महेन्द्र कॉलनी अमरावती, शेख नजीर शेख कदीर, वय २९ वर्षे, रा. नमीला नगर, ईमाम नगर जवळ, अमरावती असे आहे.

# ट्रक - कारच्या अपघातात एक जण ठार

प्रतिनिधी २० ऑगस्ट

## अमरावती अकोला मार्गावरील घटना

**अमरावती:** ट्रक व कारमध्ये झालेल्या भीषण अपघातानंतर कारचालक ठार झाल्याची घटना अमरावती- अकोला बायपास मार्गावर रात्री उशिरा घडली.

किशोर मांगीलाल काकानी( 65 ) रा. कामरगाव असे मृताचे नाव



असल्याचे पोलिसांनी सांगितले. अकोला बायपासवरील लोणी तंदुरी हॉटेलजवळ भीषण अपघात झाला.

घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पोलिस व आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी रवाना झाल्याची माहिती मिळाली आहे.

लोणी पोलिसांचे पथक ही घटनास्थळी दाखल झाले होते.

# सार्वजनिक गणेशोत्सवातील वर्गणी गोळा करण्यासाठी पूर्वपरवानगी घ्यावी

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती:** सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे वर्गणी गोळा करण्याकरिता धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांची पूर्वपरवानगी घ्यावी, असे आवहन धर्मदाय सह आयुक्त दीपक खोचे यांनी केले आहे. पूर्व परवानगी शिवाय वर्गणी गोळा केल्याचे सिद्ध झाल्यास तीन महिन्या पर्यंत साध्या कारावासाची किंवा संकलीत रकमेच्या दीडपट द्रव्य दंडाची शिक्षा होऊ शकते असेही सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या कलम 41-क नुसार सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था वगळून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांतर्फे गणेशोत्सव कार्यक्रमासाठी रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात पैसा,देणगी किंवा वर्गणी गोळा करण्याच्या पूर्वपरवानगीकरिता www. Charity.Maharashtra. gov.in या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून धर्मदाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मदाय आयुक्त अमरावती यांच्या कडून पूर्वपरवानगी देण्यात येणार आहे.

# धनगर समाजाच्या विकास योजनांची पूर्तता करण्यासाठी कटीबद्ध - आ.संजय खोडके

## धनगर समाजातील गुणवंतांचा आ.संजय खोडके यांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने धनगर समाजाच्या सर्वांगीण विकासाला केंद्रबिंदू मानून विविध विकास योजना कार्यान्वित केल्या आहेत. अमरावती जिल्ह्यात २०० विद्यार्थी क्षमतेचे वसतीगृह व अभ्यासिका हा त्यामधील एक महत्वाचा भाग असून नजीकच्या काळात त्यांची अंमलबजावणी केली जाणार आहे. धनगर समाजाच्या विकास योजनांची पूर्तता करण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचा विश्वास विधान परिषद आमदार - संजय खोडके यांनी व्यक्त केला.

अहिल्या महिला परिषद, अमरावतीच्या वतीने अभियंता भवन येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २३१ व्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यतिथी सोहळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य हरिभाऊ वेरूळकर, विशेष अतिथी म्हणून विधान परिषद आमदार - संजय खोडके



तर प्रमुख अतिथी म्हणून विभागीय आयुक्त नयना गुंडे, तसेच प्रसिद्ध व्याख्याते अनिरुद्ध पाटील, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट, पूर्वाध्यक्ष - नीता टेकाडे, अध्यक्ष - सुजाता नवले व सचिव - रेखा गावंडे उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना आमदार - संजय खोडके यांनी सांगितले कि, कुठल्याही समाजाचा विकास हा त्या समाजाच्या शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असतो. समाज शिक्षित व सुसंस्कारित झाला तर समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकासाला बळ मिळते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या लोकविकास, प्रजाहित कार्य व एक कुशल प्रशासक म्ह्णून ओळखल्या जातात. त्यांच्या इतिहासातून सर्वांनी प्रेरणा घेऊन सर्वांनी प्रगती व उन्नतीच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन विधान परिषद आमदार - संजय खोडके यांनी केले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुण्यश्लोक अहिल्यामातेच्या जीवनावर आधारित पुस्तक देऊन पालकांसह सत्कार करण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्त - नयना गुंडे यांनी विद्यार्थ्यांना भविष्य घडविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले तसेच पालकांचे अभिनंदन केले. अहिल्या महिला परिषदेच्या भरीव सामाजिक कार्याचेही त्यांनी कौतुक केले.

आपल्या व्याख्यानामध्ये प्रसिद्ध वक्ते- अनिरुध्द पाटील यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचा जीवनपट प्रभावीपणे उपस्थितांसमोर मांडला. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट यांनी सामाजिक उपक्रम व अहिल्या महिला परिषदेच्या कार्यावर प्रकाशझोत टाकला. अध्यक्षीय भाषणात आचार्य हरिभाऊ वेरूळकर यांनी ग्रामगीतेत महिला उन्नतीबाबत केलेल्या विचारांप्रमाणे आज अहिल्या महिला परिषदेच्या माध्यमातून महिला सक्षमपणे कार्य करीत आहेत, ही अभिनंदनीय बाब असल्याचे त्यांनी सांगितले. दरवर्षी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ट्रॉफी देणाऱ्या संगीता ढोके यांचे विशेष आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - योगिता गोहत्रे व सरलाताई यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रेखा गावंडे यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार, दि. २० ऑगस्ट २०२६
http://epaper.citynewssuperfast.com




तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...
शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अति
जमीन तब्यात घ्या, चौकशी करून गुन्हे दाखल करा; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटी
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण !
वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले
अतिक्रमण
गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !
गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात
सोमवार, दि. २० जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण...
वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फस
* चौकशी करून गुन्हे दाखल करा ; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाट
नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ!
* राजस्थान कॉलेजच्या अतिक्रमणाबाबत महसूल प्रशासनाचे 'मौनव्रत'
* सरकारी जागेतील गरीबांचे झोपडे पाडते, पण धनदांडग्यांचे कायम ठेवते
सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी !
राजस्थान आर्य महाविद्यालयाच्या अतिक्रमित जागेत बनवाबनवीची हद्द,
'त्या' वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' रद्द!
'राजाश्रय' असलेल्या संस्थाचालकांना भूमि अभिलेख कार्यालयाचा दणका
शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
अतिक्रमणीत जागेत पैसे लाटण्याचा उपक्रम,
'त्या' संस्थेत घोटाळयाचा पराक्रम !
* 'ती' वादग्रस्त जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने
* माजी कर्तेधर्ते सोमाणी आणि विद्यमान अध्यक्ष मालाणी यांच्या कार्यकाळातील कारभाराची सखोल चौकशी करा
शनिवार, दि. २५ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
डोक लावल 'संस्थाध्यक्ष' गड्याने,
शासनाची जागा शासनाला भाड्याने !
* भाडे पट्टा रद्द करा, शासनाची जागा परत घ्या, संबंधितांवर गुन्हे दाखल करा
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार, दि. २७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाकाऱ्यांनी करावे भ्रमण...
अनियमिततेची हद्द, भाडेपट्टा करा रद्द !
* सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी * संस्थाध्यक्ष लयभारी
शासनाचा निधी हडपण्यावर जोर,
संस्था चालक चोरावर मोर !
* सखोल चौकशी करा, जागा ताब्यात घ्या, संबंधितांवर गुन्हे दाखल करा
शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
साहेब, वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा
* शासनाची जमीन शासनाच्या ताब्यात घ्या * संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा- सुभाष देव
राजस्थान महाविद्यालयाचे कारनामे निरनिराळे !
कथित वसतीगृहाच्या भाडेपट्यात 'प्राचार्या' चे हात काळे !
* संस्थाचालक, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन यांचे संगनमतात प्राचार्याचा सहभाग
* महसूल विभागाने शासनाची जागा त्वरीत परत घ्यावी
* समाजसेवी सुभाष देवढे पाटील न्यायालयात जाण्याच्या तयारीत
मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
कारवाईसाठी लागतो वेळ, टाळाटाळाचा खेळ, कोण करतो मेळ !
साहेब, वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा, संबंधितांवर गुन्हे दाखल करा - देव्हढे
राजस्थान शिक्षण मंडळाकडून...
तिहेरी लूट, अर्थपुर्ण सूट !
शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
१३ वर्षापासूनचा लढा, अतिक्रमण काढा !
साहेब, वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा, संबंधितांवर गुन्हे दाखल करा - देव्हढे

## राजस्थान शिक्षण मंडळाचे अतिक्रमण...

# शासनाची जागा, शासनाला भाड्याने... तिहेरी लूटले गड्याने !

## वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा

* शासकीय जागेवर अतिक्रमण केले
* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लाटले
* शासनाची जागा शासनालाच भाड्याने



### महसुलमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे टाळाटाळीचे सत्र...

१३ वर्षापासून राजस्थान आर्य शिक्षण संस्थेने अनाधिकृत ताब्यात घेतलेली महसुल प्रशासनाची जागा ताब्यात घ्यावी असे पत्र तत्कालीन महसुल मंत्री व जिल्हाधिकारी व आताचे महसुल मंत्री व जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिले आहे. मात्र प्रशासनात असलेल्या भ्रष्ट अवगुण असलेल्या धुर्त कर्मचाऱ्याने आर्थिक देवाण घेवाण करून टाळाटाळीचे सत्र सुरू ठेवले आहे. महसुल मंत्र्याच्या व जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला लालफितीत ठेवणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करून जागा ताब्यात घ्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी केली आहे.

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून मुलींच्या वसतीगृहाची मोठ्ठी ईमारत बेकायदेशीर बांधली. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेली वसतीगृहाची ईमारत चक्क वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मुलींच्या वसतीगृहासाठी नियमबाह्य भाड्याने देवून भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे.ही जागा शासनाच्या मालकीची असून राजस्थान कॉलेजच्या प्राचार्यासह संस्थाध्यक्षांनी कागदपत्रात हेराफेरी करून कोट्यवधीचा मलीदा लाटला आहे. तर दुसरीकडे शासन गरीबाच्या अतिक्रमणाची तक्रारीची दखल घेवून गरीबांचे अतिक्रमण काढते. तर तिसरीकडे १३ वर्षापासून तक्रारी करूनही श्रीमंताचे अतिक्रमण काढत नसल्याने अधिकाऱ्याकडून अर्थपूर्ण गरीब - श्रीमंत अशी फूट पाडल्या जात आहे. त्यामुळे नियम व कायद्या वापरून शासनाची जमीन शासनाला परत करून शासनाचा फायदा करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळामार्फत सुरू असलेल्या राजस्थान महाविद्यालयाने जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर अनेक वर्षापासून अतिक्रमण केलेले आहे.या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून बेकायदेशीररित्या शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हा गैरप्रकार सर्वप्रथम सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांच्या निदर्शनास आली.देवढे पाटील यांनी या प्रकरणाची तक्रार येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.त्यानंतर त्यांनी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा सुद्धा केला.या प्रकरणाबाबत दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून 'या' अतिक्रमणाकडे शासनाचे लक्ष वेधले होते.तरीही वाशीमच्या महसूल प्रशासनाने 'या' अतिक्रमणाला 'राजाश्रय' देवून आजपर्यंत ते अतिक्रमण काढण्यासाठी आणि ती कोट्यवधीची जागा शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी पुढाकारच घेतला नसल्याचा आरोप सुभाष देवढे यांनी केला आहे.राज्याचे विद्यमान कर्तव्यदक्ष महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास 'ही' गंभीरबाब आणून देवून महसूल प्रशासनाचा नाकर्तेपणाही उघडकीस आणून दिला आहे.देवढे पाटील यांचा या प्रकरणात शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.आता 'हे' अतिक्रमण महसूल प्रशासन काढण्यासाठी केव्हा मुहूर्त काढणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

---

## थोडक्यात

### मंगरुळपीर ब्रह्माकुमारीज सेन्टरला नशामुक्त भारत प्रतिज्ञा अभियान



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय मंगरूळपीर येथे १६ ऑगस्ट रविवारी सकाळी नशा मुक्त भारत प्रतिज्ञा महाअभियानाचे उदघाट्न मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगरुळपीर सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी सारिका दीदी तर प्रमुख अतिथी म्हणून सुधीर घोडचर ग्राहक पंचायत तथा नगरसेवक, राजेश जयस्वाल नगरसेवक,श्रीहरी प्रकाश इंगोले मुख्य संयोजक इंडिया फाउंडेशन स्कूल तथा नगरसेवक,रमेश मुंजे पत्रकार,

डॉ. कौस्तुभ रत्नपारखी बीजेपी युवा नेता प्रतिभाताई भोजने नगरसेविका इत्यादी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला व मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून नशा मुक्त भारत अभियानाचे उदघाट्न संपन्न झाले. ब्रह्माकुमारी सारिका दीदींनी अभियानाचा उद्देश उपस्थितना सांगितला नशा करणारा व्यक्ती हा केवळ स्वतःचे नुकसान करीत नाही तर त्याच्यामुळे एकूण सामाजिक स्वास्थावर विपरीत परिणाम होतात.भारताला जागतिक स्तरावर उंचीवर न्यायचे असेल नशा मुक्त भारत बनविणे अनिवार्य आहे त्यासाठी प्रत्येक भारतीयांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचे आवाहन सारिका दीदींनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ब्रह्माकुमारी गौरी दीदीनी केले. प्रसंगी मोठया संख्येने भाऊ बहिणी उपस्थित होते.

---

## पेट्रोलिंग गाडी पुढे; चोरट्यांची चोरी मागे !

### महालक्ष्मी किराणा दुकानात चोरी

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

समोरील शटर दरवाजा तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला आणि किराणा दुकानावर डल्ला मारल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांची पेट्रोलिंग गाडी परिसरातून पुढे सरकताच काही वेळातच किराणा दुकानावर चोरट्यांनी डल्ला मारण्याची घटना समोर आली आहे. शिरपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावरील शिवाजी हायस्कूलजवळ असलेल्या आशिष मानवतकर यांच्या महालक्ष्मी किराणा दुकानात गुरुवार, २० ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे ४ वाजून ५९ मिनिटांच्या सुमारास चोरी झाल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार शिरपूर पोलीस स्टेशनची पेट्रोलियम गाडी ही तीन पन्नास तीन चार च्या सुमारास केनवड येथे होती त्यामुळे गाडी पुढे सरकताच चोरट्यांनी दुकानावर डल्ला मारण्याची घटना उघडकीस आली आहे.प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी किराणा दुकानाला लक्ष्य करून दुकान फोडून चोरी केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. त्यानंतर शिरपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी पोलिसांकडून पंचनामा व तपासाची प्रक्रिया सुरू




असून, फॉरेन्सिक टीम तसेच श्वान पथकानेही घटनास्थळी पाहणी करून चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी दुकान परिसरात पिवळ्या रंगाची सुरक्षा पट्टी लावून परिसर सुरक्षित केला आहे.दरम्यान, चोरीमध्ये नेमका किती मुद्देमाल अथवा रोख रक्कम लंपास झाली, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. त्यामुळे चोरट्यांची ओळख पटविणे पोलिसांसमोर आव्हान ठरले आहे.मात्र परिसरातील इतर दुकाने, आस्थापने किंवा रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गालगतच्या व्यापारी परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.शिरपूर पोलीस या चोरीच्या घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

---

## वाशीम एमआयडीसीच्या विकासाचा सुरू होणार विधी, ४८.६७ कोटींचा मंजूर झाला निधी !

### उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या दालणात पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांची बैठक

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●






वाशिम जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी वाशिम एमआयडीसीच्या पायाभूत सुविधांसाठी एकूण ४८ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रयत्नातून हा निधी उपलब्ध झाला असून, यामुळे एमआयडीसीमधील रस्ते, पाणीपुरवठा, वीज तसेच उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार आहे.

वाशिम एमआयडीसीसंदर्भातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकारातून उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मंत्रालयातील दालनात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.वाशिम एमआयडीसीतील रस्ते विकासासाठी १८ कोटी रुपये, तर पाणीपुरवठा सुविधांसाठी १६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच महावितरणच्या कामांसाठी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ३ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी देण्याचे मान्य केले आहे. याशिवाय श्एई पार्कच्या विकासासाठी १० कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण होऊन वाशिममध्ये नव्या उद्योगांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे. दरम्यान, वाशिममध्ये लॉजिस्टिक पार्क उभारण्याबाबतही चर्चा झाली. यासंदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी संबंधित बाबींची माहिती घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

वाशिमच्या औद्योगिक विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांचे आभार मानले. या निधीमुळे वाशिम एमआयडीसीच्या विकासाला गती मिळून स्थानिक पातळीवर उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.वाशिमच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, एमआयडीसीतील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. उद्योजकांना विविध परवानग्या लवकर मिळाव्यात यासाठी एमआयडीसी चे प्रादेशिक अधिकारी यांनी अकोला येथे आठवड्यातून एक दिवस अनिवार्यपणे उपस्थित राहून परवानगीसंदर्भातील प्रकरणांचा निपटारा करण्याच्या सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिल्या आहेत. याप्रसंगी खासदार संजय देशमुख, आमदार भावना गवळी, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार श्याम खोडे, आमदार अमित झनक, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, एमआयडीसीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुंभार, एमआयडीसी चे प्रादेशिक अधिकारी, औद्योगिक विकास संघटनेचे अध्यक्ष अंगद राऊत आणि सचिव अतुल भोतकर यांच्यासह संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

---

## ग्रामसभेत वाद, ग्रामसेवकाचा झाला घात...

# ग्रामसेवकांचा ग्रामसभांवर राज्यव्यापी बहिष्कार !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

ग्रामसभा ही गावाच्या विकासासाठी प्रश्न विचारण्याचे आणि कामकाजाची माहिती घेण्याचे लोकशाही व्यासपीठ आहे. मात्र ग्रामसभेत एका विषयावर चर्चा सुरू असताना दुसरा विषय काढणे, वारंवार प्रश्नांचा भडिमार करणे, आवाज वाढवून गोंधळ निर्माण करणे आणि ग्रामसेवकांवर मानसिक दबाव आणणे योग्य नाही. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शेवरे दिगर येथील ग्रामसभेदरम्यान झालेल्या वादानंतर ग्रामसेवक पी. एन. पाटील यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून, या घटनेनंतर ग्रामसभांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांवर येणाऱ्या मानसिक दबावाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.




ग्रामस्थांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत प्रश्न विचारण्याचा आणि माहिती मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. गावातील विकासकामांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता किंवा निधीचा गैरवापर झाल्याचा संशय असल्यास पुराव्यानिशी गटविकास अधिकारी, पंचायत समिती किंवा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करावी. तक्रारीची चौकशी करून दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाऊ शकते. मात्र ग्रामसभेचा वापर राजकीय शक्तिप्रदर्शनासाठी किंवा स्वतःची पुढारी म्हणून प्रतिमा निर्माण करण्यासाठी होऊ नये. प्रश्न विचारताना नियम, शिस्त आणि संयम पाळणे आवश्यक आहे. व्यक्तिगत आरोप, अपमानास्पद भाषा, धमकी किंवा अनावश्यक दबाव आणण्याचे प्रकार टाळण्याची गरज आहे.शेवरे दिगर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय ग्रामसेवक संघटनेने आगामी ग्रामसभांवर राज्यव्यापी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ग्रामसेवक आगामी ग्रामसभांचे कामकाज पाहणार नाहीत. मात्र ग्रामसभा बंद राहणार नाहीत. शासनाच्या नियमानुसार ग्रामसभा घेण्यात येणार असून, ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीत संबंधित ठिकाणी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी ग्रामसभेचे कामकाज पाहतील. रिसोड तालुक्यातील ग्रामसभा २२ ऑगस्टपर्यंत घेण्यात येणार आहेत. ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपलेली नाही, तेथे सरपंच ग्रामसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक अध्यक्ष म्हणून काम पाहतील. काही ठिकाणी विशेष परिस्थिती किंवा अडचण असल्यास संबंधित ग्रामसभा २५ ऑगस्टपर्यंत घेण्यात येणार आहेत.ग्रामसभा ही गावाच्या विकासासाठी आहे. त्यामुळे ग्रामसभेत वाद, गोंधळ किंवा राजकीय शक्तिप्रदर्शन न करता विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. गावातील गैरप्रकाराविरोधात आवाज उठवताना रीतसर प्रशासकीय मार्गाचा अवलंब करावा. ग्रामसेवकांसोबत घडलेली दुर्दैवी घटना पुन्हा घडू नये, यासाठी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने जबाबदारीने वागण्याची गरज आहे.

#### ग्रामसभा थांबणार नाही; नोडल अधिकारी काम पाहणार...

ग्रामसेवकांचा बहिष्कार हा ग्रामसभेवर नसून त्यांच्या कामकाजावर आहे. शासनाच्या नियमानुसार ग्रामसभा होणारच आहेत. ग्रामसेवक कामकाज पाहणार नसल्याने संबंधित ठिकाणी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २२ ऑगस्टपर्यंत नियोजित ग्रामसभा घेण्यात येतील, तर विशेष परिस्थिती असलेल्या ठिकाणी २५ ऑगस्टपर्यंत ग्रामसभा घेण्यात येतील.

**लांडे मॅडम,** गटविकास अधिकारी, पंचायत समिती रिसोड

#### ग्रामसेवकांच्या पाठीशी रोजगार सेवक संघटना

'ग्रामसेवकांसोबत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. ग्रामपातळीवर काम करताना ग्रामसेवकांप्रमाणेच ग्रामरोजगार सेवकांनाही अशा प्रकारच्या मानसिक दबावाचा सामना करावा लागतो. ग्रामसभेत उलटसुलट प्रश्न विचारून दबाव आणणे, गोंधळाचे वातावरण निर्माण करणे आणि स्वतःला राजकीय पुढारी म्हणून दाखवण्याचा प्रयत्न करणे थांबले पाहिजे. अशी घटना पुन्हा घडू नये. ग्रामसेवक संघटनेच्या भूमिकेला व आंदोलनाला वाशिम जिल्हा ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचा पूर्ण पाठिंबा आहे.'

**विजय चवरे,** जिल्हाध्यक्ष, ग्रामरोजगार सहाय्यक संघटना, वाशिम

#### ग्रामसेवकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

'ग्रामसेवक हा गावाच्या प्रशासनातील महत्त्वाचा घटक आहे. ग्रामसभेत प्रश्न विचारणे हा प्रत्येक ग्रामस्थाचा अधिकार आहे; मात्र प्रश्न विचारताना वैयक्तिक आरोप, अनावश्यक दबाव किंवा गोंधळ निर्माण करणे योग्य नाही. गावातील विकासकामांबाबत आक्षेप किंवा भ्रष्टाचाराचे पुरावे असल्यास ते रीतसर प्रशासनाकडे सादर करावेत. ग्रामसेवकांसोबत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी ग्रामसेवकांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना करणे आवश्यक आहे.'

**राजेश आरु** ग्रामसेवक संघटना तालुकाध्यक्ष (रिसोड)

---

## कारंजा शहरात एमआयडीसी सुरू करण्याची मागणी

### खासदार संजय देशमुख यांना दिले निवेदन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●



कारंजा शहर हे मोठी बाजारपेठ असून या ठिकाणची कृषी उत्पन्न बाजार समिती सुद्धा मोठी आहे.ऐतिहासिक व शैक्षणिक शहर म्हणून सुद्धा करंज्याला ओळखल्या जाते अशा ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एमआयडीसी असणे अत्यंत आवश्यक आहे.त्याकरता यवतमाळ वाशिम मतदार संघाचे खासदार संजय भाऊ देशमुख यांना निवेदन देण्यात आले या निवेदनामध्ये म्हटले आहे की,आपले मतदारसंघातील एका अत्यंत महत्वाच्या आणि गंभीर विषयाकडे वेधून घेवू इच्छितो. आपल्या कारंजा-मानोरा मतदारसंघात सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणी यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.परंतू स्थानिक पातळीवर कोणतीही मोठी औद्योगिक वसाहत (एम.आय.डी.सी.) नसल्यामुळे या तरुणांना रोजगारासाठी मुंबई-पुणे किंवा नाशिक या सारख्या मोठ्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागत आहे. आपल्या भागात,मुबलक प्रमाणात जमीन,पाण्याची उपलब्धता आणि दळणवळणाची साधने उपलब्ध आहेत.जर आपल्या विशेष प्रयत्नातून येथे नविन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ एम.आय.डी.सी. स्थापन झाल्यास स्थानिक रोजगार मिळेल.हजारो सुशिक्षीत आणि कुशल तरुणांना गावातच रोजगार मिळेल.नविन उद्योग आल्यामुळे व्यापाराला चालना मिळेल तसेच छोटे व्यावसायीकांची प्रगती होईल. यावेळी आपण या विषयाचे गांभीर्य ओळखून हिवाळी किंवा पावसाळी अधिवेशनात किंवा वैयक्तिक पातळीवर शासनाकडे या मागणीचा जोरदार पाठपुरावा करावा.





# श्रींच्या पालखीचे संत नगरीत आगमन

## खामगाव ते शेगाव अडीच लाखांहून अधिक भाविकांनी केली पायदळ वारी

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**शेगांव :** 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने आज खामगाव ते शेगाव मार्ग अक्षरशः दुमदुमून गेला! पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी झाल्यानंतर तब्बल दोन महिन्यांचा पायदळ प्रवास पूर्ण करून श्री संत गजानन महाराजांची पालखी अडीच लाखांहून अधिक भाविकांच्या साक्षीने स्वगृही संतनगरी शेगावात परतली.

खामगाव येथून आज पहाटे पाच वाजता पालखीने शेगावकडे प्रस्थान केले. या अंतिम १७ किलोमीटरच्या टप्प्यात रस्त्यावर वाहनांपेक्षा भक्तांचीच रीघ अधिक दिसत होती. भगव्या पताका, टाळ-मृदंगांचा गजर, मुखी श्रींचा जयघोष आणि पावलोपावली उधळली जाणारी फुले यामुळे संपूर्ण मार्गाला भक्तिच्या महासागराचे स्वरूप प्राप्त झाले होते.

विशेष म्हणजे या सोहळ्यात युवा वर्गाचा सहभाग लक्षवेधी ठरला. हजारो तरुणांनी पालखीसोबत पायी चालत भक्ती, शिस्त आणि सेवेचा अनोखा संगम घडवून आणला. मार्गावरील गावागावांत भाविकांनी पालखीचे जल्लोषात स्वागत करत वारकऱ्यांसाठी पाणी, फराळ आणि प्रसादाची व्यवस्था केली.

सकाळी अकरा वाजता श्री गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर पालखीचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर शेगावच्या मुख्य मार्गावरून पालखीची नगरपरिक्रमा सुरू झाली. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भाविकांनी श्रींच्या पालखीवर पुष्पवृष्टी करत दर्शनासाठी मोठी गर्दी केली.

सायंकाळी सहा वाजता पालखी श्री गजानन महाराज मंदिरात भव्य-दिव्य थाटात दाखल होणार असून, या ऐतिहासिक क्षणासाठी अवघी संतनगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे.

भाविकांसाठी अतिरिक्त बस सेवा. खामगाव ते शेगाव पायी येणाऱ्या भक्तानां परत जाण्या येण्या करीता दरम्यान भक्तांची गर्दी पाहता एस टी महामंडळाच्या वतीने जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली यामध्ये शेगाव आगाराच्या वतीने अतिरिक्त बसेस बुलडाणा, चिखली, खामगाव, मेहकर,जळगाव जामोद, शेगाव, मलकापूर,. इत्यादी.

श्रींच्या महाप्रसाद, दर्शन श्री गजानन वाटिका या ठिकाणी व श्रींच्या मंदिर परिसरातील महाप्रसाद या दोन्ही ठिकाणी एक लाखाहून अधिक भाविकांनी महाप्रसाद लाभ घेतला.श्रींच्या समाधी दर्शनासाठी ३ तास तर श्रीमुख दर्शनासाठी १ तास वेळ लागत आहे.

खामगांव शेगांव पालखी मार्गवर गर्दित कोणताही अनुचीत प्रकार घडु नये म्हणुन अपर पोलीस अधीक्षक खामगांव यांच्या मार्गदर्शनाखाली खामगांव, शेगांव शहरात एकुण ५०० पोलीस कर्मचारी, अधिकारी ठिकठिकाणी चौखबंदोबस्त लावन्यात आला होता तर वाहनांमुळे भाविकांला त्रास होऊ नये या करीता वाहनांना शहरात बंदि करण्यात येऊन शहरा बाहेरुन वाहने पुढे पाठविण्यात आली.

### तुझी सेवा करीन मनोभावे

श्रींच्या पालखीत सहभागी भाविकांच्या सेवसाठी खामगांव व शेगाव येथील भाविकांकडून सेवा दिले गेली आहे यामध्ये महाराजा रेसिडेंसीसमोर भाविकांना पोह्याचे वितरण, तिरुपती ग्रुपच्या वतीने करण्यात आले तर हनुमान मंदिराजवळ साबुदाणा उसळ आणि फराळाची व्यवस्था होती. लासुरा फाट्यावरील वसंत महाराज अन्नकूटी परिवाराच्या वतीने औषध, चहा, नाश्त्याची तर सामान्य रुग्णालय प्रशासनाकडूनही भाविकांसाठी औषधोपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे तर खामगाव ते शेगाव या मार्गावर ठिकठिकाणी पाणी ,चहा, नाश्ता, फराळ, महाप्रसादाचे वितरण करण्यात आले आहे.

### भाविकांसाठी अतिरिक्त बस सेवा

खामगाव ते शेगाव पायी येणाऱ्या भक्तानां परत जाण्या येण्या करीता दरम्यान भक्तांची गर्दी पाहता एस टी महामंडळाच्या वतीने जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली यामध्ये शेगाव आगाराच्या वतीने अतिरिक्त बसेस बुलडाणा, चिखली, खामगाव, मेहकर,जळगाव जामोद, शेगाव, मलकापूर,.इत्यादी.

### शहरात भाविकांच्या महासागर...

खामगांव-शेगांव मार्ग श्रींच्या भक्तांच्या गर्दीने एक झाली गेल्या दहा वर्षांपासून खामगांव ते शेगांव १७ कि. मी. पायदळ वारीत भाविकांची संख्या कमी झाली नाही अधिक अधिक वाढ होत आहे या वर्षी जवळपास अडीच लाखांहून अधिक भाविकांनी खामगांव शेगांव पायदल वारी करुन श्री गजानन महाराज मदिरात जाऊन श्रींचे दर्शन घेतले.

### खामगाव ते शेगाव पायदळ वारी मध्ये भाविकांची संख्या दरवर्षी वाढत आहे...

श्री संत गजानन महाराजांच्या पंढरपूरहून परतीच्या पालखी सोहळ्यादरम्यान, खामगाव ते शेगाव या अंतिम टप्प्यात अडीच लाखांहून अधिक भाविकांनी अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पायदळ वारीत सहभाग घेतला. "गण गण गणात बोते" च्या जयघोषाने आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला होता.

# उघड्या वाहनातून कचऱ्याची वाहतूक; स्वच्छतेला हरताळ!

## पावसाळ्यात दुर्गंधी, घाण आणि संसर्गाचा धोका

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**खामगाव:** शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपालिका विविध मोहिमा आणि जनजागृती उपक्रम राबवित असली, तरी प्रत्यक्ष रस्त्यावर मात्र स्वच्छतेच्या नियमांची पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कचरा झाकून वाहून नेण्याऐवजी उघड्या वाहनांमधूनच वाहतूक केली जात असल्याचा 'रिॲलिटी चेक'मध्ये प्रकार समोर आला आहे. सोमवारी शहरातील मुख्य रस्त्यावरून उघड्या वाहनातून कचरा वाहून नेला जात असल्याचे दृश्य नागरिकांनी पाहिले.



कचरा संकलन केल्यानंतर तो योग्य पद्धतीने वाहून नेणे हा स्वच्छता व्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा आहे. मात्र, वाहनातून कचरा उघड्यावर वाहून नेला जात असल्याने रस्त्यावरून जाताना त्यातील प्लास्टिक, कागद, सडलेला कचरा आणि इतर हलका कचरा वाऱ्यामुळे उडण्याची शक्यता

**कचरा वाहतूक, की पुन्हा कचरा पसरण्याची प्रक्रिया?**

कचरा वाहून नेणाऱ्या वाहनामागून दुर्गंधी येणे, कचऱ्यातील घटक रस्त्यावर पडणे किंवा वाऱ्यामुळे उडणे यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात तर कचऱ्यातील घाण आणि सांडलेले पाणी रस्त्यावर पसरल्याने परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे एकीकडे कचरा उचलून स्वच्छता केली जाते, तर दुसरीकडे वाहतुकी दरम्यान तोच कचरा रस्त्यावर पसरण्याचा धोका निर्माण होतो.

**उघड्या वाहनांवर कारवाई कधी ?**

कचरा वाहतूक करणारी वाहने बंदिस्त किंवा योग्य प्रकारे झाकलेली असावीत, जेणेकरून वाहतुकीदरम्यान कचरा रस्त्यावर पडणार नाही किंवा उडणार नाही. त्यामुळे उघड्या वाहनातून कचरा वाहून नेण्याचा प्रकार तातडीने थांबवून संबंधित कंत्राटदार अथवा यंत्रणेला स्पष्ट सूचना देण्याची गरज आहे. नियमांचे उल्लंघन होत असल्यास दंडात्मक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सानंदांच्या पुढाकाराने पिंपळगाव राजा येथे सुरु असलेल्या आमरण उपोषणाची सांगता

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**खामगाव:** खामगाव तालुक्यात अंदाजे 35 हजार लोकसंख्या असलेल्या पिंपळगाव राजा येथे ग्राम पंचायतशी संबंधीत विविध समस्या,विकासकामे,पाणी पुरवठा,पारदर्शक प्रशासन आणि कथीत आर्थिक अनियमिततेच्या चौकशीसाठी ठिय्या आंदोलन व बेमुदत आमरण उपोषण आंदोलन सुरु करण्यात आले होते. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या संबंधीत अधिकाऱ्यांना उपोषण मंडपात बोलावुन आंदोलनकर्त्यांच्या मागण्या लेखी स्वरुपात मान्य करुन देत,उपोषण कर्त्यांचे आंदोलन सोडविले.

यावेळी बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, समयबध्द कालावधीत या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी,कुठल्याही राजकीय दबावाला बळी पडुन ताथुर-मातुर चौकशी केल्यास अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही,पालकमंत्री हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असल्या कारणाने वरीष्ठ अधिकाऱ्यांनी निपःक्ष चौकशी करुन अहवाल सादर करावा,जनतेच्या हितासाठी,अन्यायाच्या विरोधात लढा देणाऱ्या युवकांच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदैव खंबीरपणे उभा असल्याचे सानंदांनी सांगितले तसेच युवा मंच यांनी उभारलेल्या लढयाची प्रशंसा करत युवा मंचचे इंजिनिअर शोहेब आसीम व हसन इनामदार,नानाराव इंगळे,शेख रईस यांच्यासह सहभागी झालेल्यांना शाबासकीची थाप सुध्दा दिली. पिंपळगाव राजा गावामध्ये टाकण्यात आलेल्या पिण्याच्या पाईप लाईनमध्ये अनेक ठिकाणी लिकेज व वॉल लिकेज,घंटागाडी सुरु करणे, ग्राम पंचायतमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी,नवीन नळ योजना पाईप लाईनच्या गुणवत्तेची तपासणी , ग्राम पंचायतचे अधिकारी यांनी मुख्यालयी रहावे, 35 हजार लोकसंख्येच्या गावात स्वच्छतेसाठी फक्त 2 कर्मचारी, घंडागाडया , जिल्हा परिषद शाळेमध्ये रिक्त असलेली शिक्षकांची पदे तसेच यासह इतर मागण्या घेवुन दि.12 ऑगस्ट 2026 पासुन पिंपळगाव राजा येथे युवा मंचचे इंजिनिअर शोहेब आसीम व हसन इनामदार,नानाराव इंगळे,शेख रईस यांच्यासह काही लोकांनी सहभागी होत आंदोलन सुरु केले होते.

### पिंपळगाव राजा ग्राम पंचायत कारभाराचा पाच वर्षाचा ऑडिट होणार

पिंपळगाव राजा ग्राम पंचायतमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, ग्राम पंचायतचा 2021 पासुन मागील 5 वर्षाचा ऑडिट यासह उपोषण कर्त्यांनी दिलेल्या निवेदनातील प्रत्येक मुद्याची वरीष्ठ स्तरावरील 3 अधिकाऱ्यांची नेमणुक करुन समयबध्द कालावधीत सखोल चौकशी केली जाईल व चौकशी अंती दोषी आढळलेले अधिकारी व तत्कालीन ग्राम पंचायत सरपंच व सदस्यांवर कठोर कारवाई केली असे पंचायत समितीचे बीडीओ सतीष देशमुख व जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी (ग्राम पंचायत विभाग)अधिकारी शिवशंकर भारसाकळे यांनी लेखी आश्वासन व लेखी लिहुन दिल्यानंतर उपोषणाची यशस्वी सांगता माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

# मलकापूर बस स्थानकात मद्यधुंद इसमाचा धिंगाणा लोखंडी रॉडने पाच एसटी बसच्या काचा फोडल्या



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**मलकापुर :** शहरातील बस स्थानकात मद्यधुंद अवस्थेतील एकाने लोखंडी रॉड च्या सहाय्याने बस स्थानकात उभ्या असलेल्या पाच बससेच्या दर्शनी काचा फोडून सुमारे 80 हजार रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याची घटना दि. 18 ऑगस्ट 26 रोजी पहाटे दिडच्या वाजेच्या सुमारास घडली .याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी संजय गवई रा. चिंचोल ता. मलकापूर याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.शहर पो.स्टे ला राज्य परिवहन विभागात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेले संजय सुखदेव खंडागळे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की,ते मलकापूर बस स्थानकात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत घटनेच्या वेळी नाईट राउंड ड्युटीवर होते बस स्थानकात झोपलेल्या प्रवाशांना बस आल्याने उठवत असताना त्यांना अचानक तोडफोडीचा आवाज येऊ ऐकू आला खंडागळे हे सहकार्यासह आवाजाच्या दिशेने गेले असता एक इसम हातात लोखंडी रॉड घेऊन बसस्थानकात उभ्या असलेल्या एसटी बसच्या दर्शनी काचा फोडताना दिसला. त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने हाताला घटका देऊन तेथून पुढे काढला. संबंधित इसम दारूचे नशेत असल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले.या घटनेत एम एच 40 वाय 5830,एम.एच 14 बि.टी 4356, एम एच 40 ऐ क्यु 6442,एम एच 40 ऐ क्यु 6442,एम एच 40 वाय 5695 या पाच एसटी बसेसच्या दर्शनी काचा फोडण्यात आल्या प्रत्येक काचेची किंमत अंदाजे 16 हजार रुपये असून 80 हजार रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. फिर्यादी संजय सुखदेव खंडागळे यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा क्रमांक 606/26 कलम 324 (4) BNS तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधात्मक अधिनियमाच्या कलम 3 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# ग्रामपंचायतीच्या जागेत अनधिकृत पुतळा बसविला; तिघांवर गुन्हा

## धानोरा महासिद्ध येथील घटनाः पोलिसांकडून पंचनामा

**जळगाव जामोद:** तालुक्यातील धानोरा महासिद्ध येथे ग्रामपंचायतीच्या शासकीय जागेत कोणतीही अधिकृत परवानगी न घेता महापुरुषाचा अर्धाकृती पुतळा बसविल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जळगाव जामोद पोलिसांनी गुन्हा दाखल केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजतापूर्वी धानोरा महासिद्ध येथील श्रीकृष्ण श्रीराम वानखडे यांच्या घरासमोरील ग्रामपंचायतीच्या जागेत सुमारे ४ ते ५ फूट चौकोनी आकाराचा सिमेंट विटांचा चबुतरा तयार करून त्यावर अर्धाकृती पुतळा बसविल्याचे निदर्शनास आले. संबंधितांनी कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नसल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी ग्रामपंचायत कर्मचारी राजेश त्र्यंबक व्यवहारे (५१) यांच्या फिर्यादीवरून दिगांबर शालिग्राम हिवरकार (३९), सुनील सुरेश कुवारे (२८) आणि संदीप साहेबराव खुपासे (४२), (सर्व रा. धानोरा महासिद्ध) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ३२९(३), २२३, ३(५) तसेच महाराष्ट्र पुतळ्यांच्या पावित्र्य भंगास प्रतिबंध अधिनियम, १९९७ मधील कलम ५२ (१), ५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रींच्या दर्शनाने विधायक कार्य करण्याची ऊर्जा- माजी आ. सानंदा

## श्रींच्या पालखीचे सानंदा परिवाराच्या वतीने उत्स्फुर्त स्वागत



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**खामगाव :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरवरुन परतलेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे मंगळवार दि.18 ऑगस्ट 2026 खामगांव नगरीमध्ये आगमन झाले.शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत ही पालखी दुपारी 3.30 वाजताच्या सुमारास हिंदुसुर्य महाराणा प्रताप चौक येथे आली असता सानंदा परिवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे श्रींच्या पालखीचे फटाक्यांची भव्य आतीषबाजी,ढोल नगारे,पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले. तद्नंतर ही पालखी अरजण खिमजी नॅशनल हायस्कुल येथे आली असता माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा,माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा,माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा,सौ. सवितादेवी सानंदा यांच्यासह सानंदा परिवारातील सदस्य व स्वातंत्र सेनानी स्व.श्रीराम पाटील यांच्या परिवारातील सदस्यांच्या हस्ते श्री संत गजानन महाराजांची आरती करण्यात आली.

याप्रसंगी उद्योजक राणा मुकेशसिंह सानंदा,माजी नगराध्यक्षा श्रीमती भारतीताई राजपुत,राणा आनंदकुमार सानंदा,राणा सागरकुमार सानंदा,राणा गौरवकुमार सानंदा,राणा दिग्वीजयसिंह सानंदा यांच्यासह सानंदा परिवारातील सदस्य उपस्थित होते.याप्रसंगी संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमावर सानंदा यांच्या शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, संत गजानन महाराजांच्या पालखीचे खामगाव नगरीत आल्यामुळे खामगाव शहराला यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले असुन हजारो लोकांनी श्रींच्या पालखीचे उत्साहात स्वागत केले. संत गजानन महाराजांच्या माध्यमातून सर्व भक्तांच्या विधायक मनोकामना पुर्ण होवो व सर्वत्र सुख,शांती लाभावी आणि बळीराजा सुखी,समृध्द व्हावा,देशासह राज्यामध्ये शिव-शाहु-फुले-आंबेडकर-महात्मा गांधी यांचे विचार प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये रुजावे, संविधान व समतेचे राज्य निर्माण व्हावे अशी प्रार्थना करुन श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनाने विधायक कार्य करण्याची ऊर्जा येते असे त्यांनी सांगितले.जलमित्र राणा अशोकसिंह सानंदा यांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलींनी पालखीच्या स्वागतासाठी राधाकृष्ण, शंकर-पार्वतीची आकर्षक वेशभुषाा साकारुन उपस्थितांचे लक्ष वेधुान घोतले होते.श्रींच्या पालखीनिमित्त सानंदा निकेतन समोर संत गजानन महाराजांची आकर्षाक मुर्ती लावुन भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेसचे खामगाव तालुका अध्यक्ष मनोज वानखडे,प्रफुल कुळकर्णी,दुर्गासिंग ठाकुर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# संपूर्ण व्याजमाफी योजना, विविध सेवाशुल्क माफीला मुदतवाढ- डॉ. जयराज कोरपे

## जिल्हा बँकेची 115 वी वार्षिक आमसभा उत्साहात, बँक सभासद संस्थांना 6 टक्के लाभांश






प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला :** शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याच्या उद्देशाने बँकेने संपूर्ण व्याजमाफी योजना तसेच ग्राहकांना लागू असलेले विविध सेवाशुल्क माफीला मुदतवाढ दिली असल्याचे बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी सांगितले. दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद, शेतकरी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि बँकेच्या कार्याचा आढावा डॉ. जयराज कोरपे यांनी मांडला. ते १६ ऑगस्ट रोजी बँकेच्या ११५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते. ते पुढे म्हणाले, बदलत्या काळानुसार बँकींगसेवा अधिक सुलभ आणि गतीमान व सुरक्षित करण्यावर भर देण्यात आला असून त्याअंतर्गत मोबाईल बँकींग, युपीआय, एइपीएस, क्युआर कोड इत्यादीच्या माध्यमातून डिजीटली व्यवहार करण्याच्या सुविधा बँकेद्वारे कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना बँकेच्या पारंपारीक सेवा सोबतच डिजीटल बँकींगचा लाभ घेता येत असल्याचे डॉ. कोरपे यांनी स्पष्ट केले. व्यवसायीक बांधवांना उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध व्हावे, यासाठी भांडवली कर्ज अवघ्या ९ टक्के अत्यल्प व्याजदराने उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे डॉ. जयराज कोरपे यांनी सांगितले.

आमसभेमध्ये शेती तसेच शेतीपुरक व्यवसाय यामध्ये विविध पुरस्कार प्राप्त वंदना देविदास धोत्रे रा. विवरा, सुवर्णा अरविंद गावंडे रा. शेलू, बाबन तुकाराम कुटे रा. घाटा यांचा तसेच बँकेचे कर्जावर आपल्या व्यवसायाची उल्लेखनिय प्रगती करणारे व्यवसायीक व सहकारी संस्था यामध्ये किर्ती अनिकेत बोचे व अंकुश प्रमोद दाळू मे. सुमित्राई पेट्रोल पंप ता. अकोट, वैभव प्रकाशराव गोरले मे. अमृत नोटबुक्स लसनापुर ता. मुर्तिजापूर, मंगरूळपीर तालुका को-ऑप. जिनींग ॲन्ड प्रेसींग फॅक्टरी, मंगरूळपीरचे अध्यक्ष सतिश बाहेती व उपाध्यक्ष राजेश ढोले, वाशिम जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक पतसंस्था मर्या. वाशिम चे अध्यक्ष विजय मनवर व उपाध्यक्ष राजू मते यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. आमसभेच्या आरंभी मागील वर्षात पंचतत्त्वात विलीन झालेल्या थोर विभूतींना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच आमसभेला बँकेच्या संचालिका उषाताई हिंगणकर, गिताबाई ठाकरे, कल्पनाताई पाचपोर, संचालक विश्वनाथ ताथोड, अरविंद इंगोले, गोपाल काकड, अनिलकुमार जाधव, संदीप खारोडे, डॉ. धिरज देशमुख, डॉ. अभिषेक तिडके, धनंजय गोरे, अजिंक्य राऊत, जावेदउल्लाह खान हि. पटेल तसेच कर्मचारी प्रतीनीधी अजय माहोरे, विवेक पाटील उपस्थित होते. आभार बँकेचे उपाध्यक्ष रामेश्वर ठाकरे तर संचालन अपर्णा उके यांनी मानले. सभेस सभासद संस्थांचे प्रतिनीधी, बँकेचे अधिकारी/कर्मचारी व गटसचिव मोठ्या संखेने उपस्थित होते.

### चांगलं काम करीत राहा - डॉ. संतोषकुमार कोरपे

सभेमध्ये बँकेचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ संचालक डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी गौरवशाली वारसा लाभलेल्या सहकार क्षेत्रामध्ये तरूणांना संधी देण्याची आपली भूमिका मांडली. तसेच चांगलं काम करीत रहा, चांगलं काम केल्याने ते सामुहीक हिताचे होते, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी बँकेच्या संचालिका अपर्णाताई धोत्रे, संचालक ललील बहाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांनी समयोचित मार्गदर्शन केले.

# सेवानिवृत्तांच्या समस्या मार्गी लावणे पुण्यकर्म -आ. रणधीर सावरकर



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला :** सेवानिवृत्त जेष्ठ कर्मचाऱ्यांच्या समस्या मार्गी लावून त्यांना न्याय मिळवून देणे हे मोठे पुण्य कर्म आहे. नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या भाजप सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सेलने हे कार्य आस्थापूर्वक करावे असे आवाहन आमदार रणधीर सावरकर यांनी केले आहे.

या सेलच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आ. सावरकर यांनी एका बैठकीचे आयोजन केले होते. त्यात या सेलच्या संबंधित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी सदर सेलचे संयोजक सुनील जानोरकर, सहसंयोजक प्रदीप खाडे, सरचिटणीस राजेंद्र नेरकर, कोषाध्यक्ष अशोक मांगुळकर उपस्थित होते.

तीस-पस्तीस वर्षाची सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच काही समस्या असतात. या समस्या सोडविण्यासाठी त्यांना त्रास सहन करून संबंधित कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. त्यांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी पुढाकार घेऊन या सेलची स्थापना केली आहे. हा सेल स्थापन होताच तीन महिन्यात सुमारे 67 सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या मार्गी लावण्यात या सेलला यश आले आहे. सेलच्या या कामगिरीबद्दल अनेक ज्येष्ठ कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या सेल मार्फत सेवानिवृत्ती अथवा मृत्यूच्या दिनांकावर शिल्लक असलेल्या अर्जित रजेची समतुल्य रक्कम एका महिन्याच्या आत मंजूर करावी. या महत्त्वपूर्ण मागणीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना सादर करण्यात आले आहे. याशिवाय इतरही काही महत्त्वाच्या मागण्या जि. प. प्रशासनाकडे सेल मार्फत सादर करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना गौरी गणपती सणापूर्वी महागाई भत्ता वाढ व थकबाकी अदा करण्यात यावी अशीही मागणी वजा विनंती मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी यांच्या काही समस्या अथवा मागण्या असल्यास त्यांनी योग्य कागदपत्रांसह आपले निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या पालकमंत्री यांच्या कार्यालयातील भाजप सेल कडे कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात असे आवाहन करण्यात आले आहे.

# अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला :** बाभुळगाव जहागीर नजीक दुचाकीस्वार अपघातात गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. जखमी डाबकी रोड येथील रहिवासी असून एका वाहनाने धडक दिल्याने अपघात झाला असे कळते. घटनास्थळावर तुटलेली नंबर प्लेट आढळली. जखमीला खाजगी दवाखान्यात हलवले. बाभुळगाव जहागीर राष्ट्रीय महामार्गावर शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वळणावर 19 ऑगस्ट रोजी एका दुचाकी स्वराला चार चाकी ने उडून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. दुचाकीस्वार एम एच 30 bJ 4970 ने अकोलाकडे येत होता. दरम्यान इंजिनिअरिंग कॉलेज कडे जाणाऱ्या महामार्गावर या युवकाचा गंभीर अपघात झाला. गंभीर जखमी झालेल्या दुचाकी स्वराचे नाव त्याच्याजवळ मिळालेल्या आधार कार्ड नुसार विजय वसंतराव पंडितकर असून डाबकी रोड गल्ली नंबर 2 अकोला येथील रहिवासी असल्याचे कळते. अपघात स्थळावर एका चार चाकीची तुटलेली नंबर प्लेट क्रमांक एम एच 30 AF 0481 अपघातस्थळी मिळाली. या चार चाकीने उडून दिल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तपास एमआयडीसी पोलीस करीत असून जखमी वर एका खाजगी दवाखान्यात उपचार सुरू आहे.

# हिवरखेड पोलिसांना नवीन बोलेरो व्हॅन प्राप्त



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**हिवरखेड :** पोलिस ठाण्यात शासनाच्या वतीने व पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १८ व्हॅन वितरीत करण्यात आल्या. यामध्ये हिवरखेड पोलिस स्टेशन यांची सुद्धा वर्णी लागली. या पोलिस स्टेशनला ठाणेदार सचिन पाटील यांच्या पाठपुराव्याने नवीन ब्युलेरो व्हॅनची औपचारिक सुरुवात करण्यात आली असून हिवरखेडसह पोलिस स्टेशन हद्दीत आता पोलिसांना तात्काळ गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व्हॅनने जाणे येणे सोयीचे होईल, पोलिस स्टेशन मध्ये व्हॅनची औपचारिक सुरुवात करते वेळी ठाणेदार यांच्यासह संपूर्ण पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते.




अकोला शहरात स्टेशन रोडवरील झाडे दरवर्षी लावतात. परंतु महानगरपालिका यंत्रणा त्यांना पाणी टाकत पण नाही त्यामुळे झाडे सुकू लागली आहे. पावसाळा सुरू असून देखील ही अवस्था निर्माण झाली आहे.

# अमरावतीत कुंटणखाण्यावर कारवाई

## भरोसा सेल व दामिनी पथकाची कारवाई



प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अमरावती :** अमरावतीतील पवन नगर 1 मध्ये कुंटणखाना चालणाऱ्या एका महिलेच्या घरावर दामिनी पथक व भरोसा सेलच्या पथकाने कारवाई करून कुंटणखाना चालणाऱ्या महिला सह इतर दोन महिलांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई बुधवारी रात्री उशिरा करण्यात आली. अमरावतीत अनेक ठिकाणी कुंटणखाना सुरू असल्याने या कारवाईमुळे कुंटणखाना चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ प्राजंली सोनवणे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय अमरावती शहर हद्दीत पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर, पो.हवा. राजेश यादव म.पो.कॉ. भाग्यश्री पवार, पल्लवी कोळकार, मनोज बोकाडे, देवानंद बागडे आदी पोलिसांच्या पथकाने पो.स्टे. राजापेठ येथील पवन नगर १ अमरावती येथील घरामध्ये फंटर रेड केला. असता एक स्त्री घरात स्वताःचे आर्थिक फायदया करिता स्त्रीयां पुरवुण त्यांचेकडुन देह व्यापार करुन घेत असतांना मिळुन आली. सदर ठिकाणी २ महिला मिळुन आले. त्यांचे पासुन १०२०/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे. नमुद महिला आरोपी विरुध्द अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कायदया अन्वये कार्यवाही करण्यात आली. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रातील महिलांना व विद्यार्थीना तसेच बालकांना कुटल्याही प्रकारे छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर त्रास होत असल्यास निर्भय होवुन हेल्पलाईन क्रमाकः ११२, १०९१,१०९८ यावर पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहान करण्यात येते. छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर गैरप्रकार आढळुन आल्यास सबंधितांवर कायदेशिर कटोर कार्यवाही करण्यात येईल.

# जिल्ह्यातील सरपंच आरक्षणाचे गणित बदलले!

## 876 ग्रा.पं.च्या आरक्षणासाठी नव्या मार्गदर्शनाची प्रतीक्षा!

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**बुलढाणा :** जिल्ह्यातील सरपंचपदांच्या आरक्षणाचे गणित पुन्हा बदलले आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांचे एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यासाठी नागरिकांचा मागास प्रवर्गातील २१ पदे कमी करण्यात आली असून, ती खुल्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत. ८७० शासनाच्या राजपत्रात जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संख्या नमूद असताना प्रत्यक्षात ही संख्या ८७६ झाल्याने अतिरिक्त सहा पदांच्या प्रवर्गनिहाय वाटपाबाबत सुधारित मार्गदर्शनाची आवश्यकता निर्माण झाली.ग्रामविकास विभागाने १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रानुसार, जिल्ह्यात नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी पूर्वी निश्चित केलेली २३५ सरपंचपदे कमी करून २१४ करण्यात आली आहेत. त्यातील महिलांसाठीची पदे ११८ वरून १०७ झाली आहेत. दुसरीकडे, खुल्या प्रवर्गातील पदसंख्या ४१४ वरून ४३५ करण्यात आली असून, खुल्या प्रवर्गातील महिलांची पदे २०७ वरून २१८ झाली आहेत.

### आरक्षित ४३५; खुली ४३५

८७० ग्रामपंचायतींच्या हिशेबाने अनुसूचित जातींसाठी १७१, अनुसूचित जमातींसाठी ५० आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २१४ अशी एकूण ४३५ पदे आरक्षित आहेत. उर्वरित ४३५ पदे खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आली आहेत. खुल्या पदांवर सर्व प्रवर्गातील उमेदवारांना निवडणूक लढविता येते. दरम्यान, नवीन ग्रामपंचायतींच्या निर्मितीनंतर जिल्ह्यातील एकूण संख्या ८७६ झाली आहे. त्यामुळे ५० टक्क्यांच्या मर्यादेनुसार आरक्षित आणि खुल्या प्रवर्गासाठी प्रत्येकी ४३८ पदे उपलब्ध होतात. राजपत्रातील संख्या आणि प्रत्यक्ष ग्रामपंचायतींची संख्या यांत सहा पदांचा फरक असल्याने त्यांचे आरक्षण स्वतंत्रपणे निश्चित करावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अ.जा. आणि अ.जमाती आरक्षण ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निश्चित होते. त्यामुळे १२ ऑगस्टच्या शुद्धिपत्रात या दोन्ही प्रवर्गाच्या आरक्षणात बदल करण्यात आलेला नाही. महिलांसाठी ४३६ पदे विद्यमान तक्त्यानुसार अनुसूचित जातींची ८६, अनुसूचित जमातींची २५, मागास प्रवर्गाची १०७ आणि खुल्या प्रवर्गाची २१८ अशी एकूण ४३६ सरपंचपदे महिलांसाठी आहेत. अतिरिक्त सहा ग्रामपंचायतींच्या वाटपानंतर महिला पदसंख्येतही बदल होऊ शकतो.आता ८७६ ग्रा.पं.चा समावेश असलेला अंतिम तक्ता प्रसिद्ध झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होईल.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

## 40 वर्षापासून रुग्णांवर यशस्वी उपचार

प्रतिनिधी २० ऑगस्ट

**अकोला:** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे




नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नाव वेदिका आहे. नाईक होमिओपॅथीमध्ये येण्यापूर्वी मला लठ्ठपणाची समस्या होती. माझे वजन खूप वाढत होते आणि मी डिप्रेशनमध्ये (नैराश्यात) गेले होते. मला व्यायाम करणे शक्य होत नव्हते आणि खूप त्रास व्हायचा. कोणतेही काम करण्याची माझी इच्छा होत नव्हती. मी गेल्या सव्वा वर्षापासून नाईक होमिओपॅथीमधून औषध घेत आहे. अवघ्या ६ महिन्यांत माझे २० किलो वजन कमी झाले आहे. डॉक्टरांनी मला खूप मदत केली. आता माझे डिप्रेशन पूर्णपणे दूर झाले आहे आणि मी व्यायामसुद्धा करू शकते. मी नाईक होमिओपॅथीच्या उपचारांनी अत्यंत समाधानी आहे.

# शिरपूर पोलिसांची पेट्रोलिंग गाडी पुढे; चोरट्यांची चोरी मागे!

## महालक्ष्मी किराणा दुकानात पहाटे चोरी




प्रतिनिधी २० ऑगस्ट

**केनवड :** शिरपूर पोलिसांची पेट्रोलिंग गाडी पुढे सरकताच काही वेळातच चोरट्यांनी किराणा दुकानाला लक्ष्य केल्याची घटना समोर आली आहे. समोरील शटर दरवाजा तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. शिरपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावरील शिवाजी हायस्कूलजवळ असलेल्या आशिष मानवतकर यांच्या महालक्ष्मी किराणा दुकानात गुरुवार, २० ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे ४ वाजून ५९ मिनिटांच्या सुमारास चोरी झाल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार शिरपूर पोलीस स्टेशनची पेट्रोलियम गाडी ही तीन पन्नास तीन चार च्या सुमारास केनवड येथे होती त्यामुळे गाडी पुढे सरकताच चोरट्यांनी दुकानावर डल्ला मारण्याची घटना उघडकीस आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी किराणा दुकानाला लक्ष्य करून दुकान फोडून चोरी केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. त्यानंतर शिरपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

घटनास्थळी पोलिसांकडून पंचनामा व तपासाची प्रक्रिया सुरू असून, फॉरेन्सिक टीम तसेच श्वान पथकानेही घटनास्थळी पाहणी करून चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी दुकान परिसरात पिवळ्या रंगाची सुरक्षा पट्टी लावून परिसर सुरक्षित केला आहे.दरम्यान, चोरीमध्ये नेमका किती मुद्देमाल अथवा रोख रक्कम लंपास झाली, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. त्यामुळे चोरट्यांची ओळख पटविणे पोलिसांसमोर आव्हान ठरले आहे. मात्र परिसरातील इतर दुकाने, आस्थापने किंवा रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गालगतच्या व्यापारी परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शिरपूर पोलीस या चोरीच्या घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135